27 Nov 2026_Layout 1 11/26/2026 10:33 PM Page 1

बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर.... या जिल्हयात एकाचवेळी प्रकाशित होणारे

नोव्हेंबर / November
शुक्रवार / Friday
दि.२७ / Dt: 27
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

www.jagmitra.com

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

बीड/Beed • वर्ष १७ वे/Year 17 • अंक ३५/Issue 35 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

आधी तक्रार, नंतर यू-टर्न; आमदारांचा चौकशी समितीवरच लाचखोरीचा बॉम्ब!

अधिकाऱ्यांवर निलंबनाचा बडगा, मग कंत्राटदारांवर गुन्हे कधी?

तक्रारदारानेच चौकशी समितीला ठरवले भ्रष्ट; गेवराईच्या ४ अभियंत्यांना कोणाचे अभय?

प्रशासनाला नागरिकांचे तीन थेट सवाल....

तक्रारीवरून कारवाई झाल्यावर आता चौकशी समितीवरच आरोप करून प्रशासकीय यंत्रणेवर दबाव आणण्याचा प्रयत्न होत आहे का? केवळ अधिकाऱ्यांचे निलंबन करून प्रकरण दाबले जाणार का? कोट्यवधी रुपये लाटणाऱ्या कंत्राटदार आणि एजन्सीजना तात्काळ काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) कधी टाकणार? गेवराई तालुक्यातील दोषी एजन्सी आणि कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करून शासकीय निधीची वसुली करण्याची मागणी लोकप्रतिनिधी कधी करणार? एकंदरीत, १३.७० कोटींच्या या घोटाळ्यात अधिकाऱ्यांच्या निलंबनावरून रामायण सुरू असताना, मूळ मलई खाणारे कंत्राटदार मात्र अद्याप मोकाट आहेत. आता महावितरण प्रशासन या आरोपांवर काय भूमिका घेते आणि दोषी कंत्राटदारांच्या मुसक्या कधी आवळल्या जातात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

कोट्यवधींचा मलिदा लाटणारे कंत्राटदार मोकाट का? नागरिकांचा संताप..

या संपूर्ण राजकीय आणि प्रशासकीय नाट्यात खऱ्या सूत्रधारांना म्हणजेच संबंधित कंत्राटदार आणि खाजगी एजन्सीजना अभय दिले जात असल्याचा संताप बीडमधील सुजाण नागरिक व्यक्त करत आहेत. प्रत्यक्ष काम न करता बोगस मोजमाप पुस्तिका (एमबी) आणि देयके सादर करून १३.७० कोटींचा निधी हडप करण्यात आला. हा प्रकार केवळ अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय किंवा कंत्राटदारांच्या सहभागाशिवाय अशक्य आहे.



बीड/जगमित्र न्यूज

महावितरणच्या बीड विभागीय कार्यालयातील २०२५-२६ च्या देखभाल व दुरुस्ती निधीतील १३ कोटी ७० लाख रुपयांच्या कथित महाघोटाळ्याला आता अत्यंत नाट्यमय आणि राजकीय वळण लागले आहे. ज्या आमदारांच्या तक्रारीवरून या घोटाळ्याची चौकशी सुरू झाली आणि ६ बड्या अधिकाऱ्यांवर निलंबनाचा बडगा उगारला गेला, त्याच गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आता थेट चौकशी समितीवरच 'लाच घेऊन सदोष चौकशी केल्याचा' खळबळजनक आरोप केला आहे. निलंबित झालेल्यांपैकी गेवराई उपविभागातील चार अभियंत्यांची पाठराखण करत आमदारांनी वरिष्ठांना पत्र धाडल्याने जिल्ह्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.आ. विजयसिंह पंडित यांनी निधी वाटपात गैरव्यवहार झाल्याची तक्रार २५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रशासनाकडे केली. उच्चस्तरीय चौकशी समितीच्या अहवालानंतर छत्रपती संभाजीनगर येथील सहव्यवस्थापकीय संचालकांनी अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत, कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे, उपकार्यकारी अभियंता शाम मोरे, सहायक अभियंता शाम कुंभार, सहायक अभियंता चंद्रकांत प्रधान आणि कनिष्ठ अभियंता महेंद्र गुंजाळ या ६ अधिकाऱ्यांना १९ नोव्हेंबर २०२६ रोजी तडकाफडकी निलंबित केले. कारवाईच्या अवघ्या चार दिवसांतच आ. पंडित यांनी कार्यकारी संचालकांना (संचलन) २३ नोव्हेंबर २०२६ रोजी पत्र पाठवून या कारवाईवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निलंबित ६ पैकी गेवराई उपविभागातील चार अभियंत्यांवर झालेली कारवाई अन्यायकारक असून, त्यांच्या निलंबनाचा फेरविचार करावा.अधीक्षक अभियंता नितीन काळे व कार्यकारी अभियंता सुनील पावरा यांच्या द्विसदस्यीय चौकशी समितीने लाच स्वीकारून सदोष चौकशी केली. या समितीवरच कठोर कारवाई करावी. प्रभारी अतिरिक्त कार्यकारी अभियंता महेश गायकवाड यांच्यासह इतर संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे.

पत्रकारांच्या मागणीला यश; अखेर शेख बिलाल मेंबर यांच्याविरूध्द गुन्हा दाखल

बीड/प्रतिनिधी



शहरातील पत्रकार कासिफ शेख यांना धमकी दिल्यानंतर सर्व पत्रकारांनी या प्रकरणात कारवाईची मागणी केली होती. अखेर पत्रकारांच्या मागणीला यश आले असून शेख बिलाल मेंबर यांच्याविरूध्द पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड येथील नगरसेवक पती शेख बिलाल यांनी पत्रकार कासिफ शेख यांना फोन लावून धमकी दिली होती. विरोधात बातमी का छापली ? असा जाब विचारत जीवे मारण्याची धमकी दिली होती व अर्वाच्च भाषेचा वापर केला होता. सदरील संभाषणाची ऑडिओ क्लीप सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर या धमकीचा सर्व स्तरातून निषेध करण्यात येत होता. या संदर्भात पत्रकारांनी बिलाल मेंबर यांच्याविरूध्द कारवाई करावी अशी मागणी लावून धरली होती. या प्रकरणात पेठ बीड पोलीस ठाण्यात तक्रार देखील देण्यात आली होती. अखेर पत्रकारांच्या मागणीची दखल घेत पेठ बीड पोलीसांनी शेख बिलाल मेंबर यांच्याविरूध्द गुन्हा दाखल (पान २ वर)

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

पशुधन उद्योजकता योजना ग्रामीण युवकांना उद्योजक बनवेल पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे

मुंबई/प्रतिनिधी



ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगारापुरते मर्यादित न ठेवता पशुधन क्षेत्रातील उद्योजक बनविण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' आजपासून कार्यान्वित करण्यात आली आहे. ग्रामीण युवकांच्या प्रयत्नांना शासनाच्या आर्थिक मदतीची जोड देऊन पशुधन क्षेत्रातील उद्योजकांची नवी पिढी घडविण्यात येईल. ही योजना ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा बदलणारी ठरेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पशुसंवर्धन विभागाने चांगले काम केल्याबद्दल पशुसंवर्धन विभागाचे अभिनंदन केले.


सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसह राज्य शासनाच्या विविध (पान २ वर)

प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिरात चोरी; चोरीचा प्रकार सीसीटीव्हीत कैद!

चांदापूर येथील साई मंदिरात अज्ञात व्यक्तीकडून चोरी; आरोपींच्या मुसक्या आवळण्याची विश्वस्त व पुजाऱ्यांची मागणी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथांच्या पवित्र नगरीपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या चांदापूर येथील श्री डोंगर तुकाई परिसरातील भव्य श्री साईबाबा मंदिरात चोरीचा प्रकार घडल्याची घटना समोर आली आहे. मंदिरात दर्शनासाठी आलेल्या एका अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचा प्रकार मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या घटनेमुळे परिसरातील साईभक्तांमध्ये चिंता व्यक्त होत असून, मंदिरातील चोरी करणाऱ्या आरोपीचा शोध घेऊन पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळाव्यात, अशी मागणी मंदिराचे विश्वस्त व पुजारी यांनी केली आहे.



साईभक्त तथा उद्योजक मा.रवींद्र पापा गित्ते सेठ व परळी वैजनाथ नगर परिषद पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांनी चांदापूर येथील श्री डोंगर तुकाई परिसरात साईभक्तांच्या श्रद्धा आणि सेवाभावातून श्री साईबाबांचे भव्य व दिव्य मंदिर उभारण्यात आले आहे. साईची कृपा आणि निष्ठेचा सुंदर संगम अशी ओळख निर्माण करणारे हे मंदिर म्हणजे परळी परिसरातील प्रति शिर्डी म्हणून भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. दररोज (पान २ वर)

ग्रामीण पोलिसांनी गस्त वाढविण्याची गरज

दर्शनाच्या बहाण्याने चोरी? साई मंदिरातील घटना सीसीटीव्हीत कैद

श्रद्धास्थानही सुरक्षित नाही? चांदापूरच्या साई मंदिरात चोरी

सोमवारी बीडमध्ये खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत दिशाचा आढावा

रेल्वे व रस्ता सुरक्षा समितीच्या मॅरेथॉन बैठका, नागरिकांच्या तक्रारी व सूचना थेट बैठकीत मांडण्यासाठी व्हॉट्सॲप क्रमांक जाहीर



बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामे, रस्ते व रेल्वे सुरक्षेच्या प्रश्नांना गती देण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांच्या सूचनेनुसार येत्या सोमवार, दि.३० नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दिशा, रेल्वे सुरक्षा आणि जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या मॅरेथॉन बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या बैठकांमध्ये सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न थेट प्रशासनासमोर मांडता यावेत, यासाठी खासदारांच्या संपर्क कार्यालयाकडून ९४७७१६१६१६ हा विशेष व्हॉट्सॲप क्रमांक जाहीर करून नागरिकांना तक्रारी पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

खा.सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लेखी पत्र देऊन या तिन्ही महत्त्वपूर्ण बैठकांचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. या बैठकांना संबंधित विभागाच्या सर्व जबाबदार अधिकाऱ्यांनी संपूर्ण माहितीसह वेळेवर उपस्थित राहावे, असे स्पष्ट आदेश (पान २ वर)

भारतीय संविधान गौरव दिन साजरा

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



आज दिनांक २६ नोव्हेंबर दुपारी २ वाजता, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड यांच्या मार्गदर्शनाखाली, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार गटाच्या वतीने भारतीय संविधान गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले यावेळी उपस्थित तालुका अध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील युवक शहराध्यक्ष सय्यद फिरोज रमेश गायकवाड रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी पंडित झिंजुर्डे गोपीनाथ चौरे तालुकाध्यक्ष ओबीसी सेल हनुमंत फड तालुका अध्यक्ष शिक्षक सेल नवनिर्वाचित सर्कल अध्यक्ष फिरोज उर्फ बबलू पठाण सिरसाळा मोहीम शेख माजी ग्रामपंचायत सदस्य शिरसाळा मोहम्मद भाई शरद इंगळे शारीरिक शेख सिद्धू गोवर्धनकर वैजनाथ सलगर अध्यक्ष दिव्यांग शेल व इतर

अंबाजोगाईत नवीन रेल्वे स्टेशन उभारणीसाठी २२ पानी प्रस्ताव सादर!

डॉ.आदित्य पतकराव यांचा पुणे रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा; प्रस्ताव दक्षिण मध्य रेल्वे व रेल्वे मंत्रालयाकडे पाठविण्याचे आश्वासन

पुणे/प्रतिनिधी

आंबाजोगाई येथे नवीन रेल्वे स्टेशन उभारण्यात यावे, या मागणीसाठी रेल्वे सल्लागार सदस्य डॉ. आदित्य पतकराव यांनी २६ नोव्हेंबर रोजी पुणे मंडल रेल्वे विभागाच्या बैठकीत २२ पानी सविस्तर प्रस्ताव सादर केला. पुणे मंडलाचे मंडल रेल्वे प्रबंधक (DRM) राजेश कुमार वर्मा, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक (Sr.DCM) अनिल पाठक यांच्यासह संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांकडे हा प्रस्ताव सुपूर्द करण्यात आला. या प्रस्तावात आंबाजोगाई शहरासह परिसरातील नागरिकांची रेल्वे प्रवासाची गरज, व्यापार, शिक्षण, आरोग्य सेवा, दळणवळण आणि भविष्यातील विकासाच्या दृष्टीने नवीन रेल्वे स्टेशनची आवश्यकता स्पष्ट करण्यात आली आहे. यात घाटनांदूर -श्रीगोंदा या जुन्या मागणी सह परळी- मुरुड, परळी - धाराशिव किंवा बार्शी या पर्यायी मार्गाची मांडणी ही करण्यात आली आहे.



प्रस्तावाची दखल घेत रेल्वे प्रशासनाने सकारात्मक भूमिका दर्शवली असून, हा प्रस्ताव दक्षिण मध्य रेल्वेकडे पाठवून पुढे रेल्वे बोर्ड व रेल्वे मंत्रालयाकडे सादर करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिल्याची माहिती डॉ. पतकराव यांनी दिली.

दरम्यान, डिसेंबर २०२६ मध्ये स्वतः रेल्वे मंत्रालयात जाऊन हा प्रस्ताव सादर करणार असल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. आंबाजोगाई येथे रेल्वे स्टेशन उभारल्यास शहरासह परिसरातील अनेक गावांना दळणवळणाची सुविधा उपलब्ध होऊन व्यापार, उद्योग, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राच्या विकासाला चालना मिळू शकते. त्यामुळे या मागणीसाठी आता रेल्वे प्रशासनासह केंद्र सरकारच्या स्तरावरही पाठपुरावा होणार आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

गोविंदसिंह राजपुत (जिल्हा प्रतिनिधी) मो. 9921876500 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ पान नं. २

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८

सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै

मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

जवाहर महाविद्यालयाच्या वतीने संविधान गौरव दिनानिमित्त जनजागृती रॅली

अणदूर/प्रतिनिधी

जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदुर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राज्यशास्त्र विभाग, सामाजिक न्याय विभाग व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने संपन्न झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते उप प्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.संविधान गौरव दिनानिमित्त हमारा संविधान हमारा स्वाभिमान या संकल्पनेवर आधारित दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ हा दिवस संविधान गौरव दिन म्हणून मोठ्या आनंदाने व उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान माजी जबाबदारी या विषयावरती प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी अनमोल असे मार्गदर्शन केले.



याप्रसंगी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान गौरव दिन रॅलीचे आयोजन करण्यात आले . याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, भारतीय संविधानाने आपल्याला सन्मानाने अभिमानाने ताठ मानेने उभारण्याचे अधिकार दिलेला आहे. गरीब श्रीमंत सर्वांना मतदानाचा अधिकार घटनेच्या माध्यमातून आपल्याला मिळालेला आहे. देशाची घटना सर्वोच्च आहे आपल्याला हक्काचं जाण असतं पण कर्तव्याचे भान राहत नाही, म्हणून हक्काबरोबर कर्तव्याची जाणीव आपल्याला व्हावे म्हणून प्रत्येक वर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन जाणीव करून देण्यासाठी साजरा केला जातो. उद्देशिकेचे वाचन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केलं या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. दयानंद कांबळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ विरभद्रेश्वर स्वामी, प्रा.डॉ. सुनील रजपूत,प्रा. नागनाथ कबाडे,महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री कुलस्वामिनी आश्रमशाळा जळकोट येथे संविधान दिन साजरा

जळकोट/विजय पिसे

तुळजापूर तालुक्यातील श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, जळकोट येथे आज दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमारी मयुरी कांबळे मॅडम यांनी केली. यावेळी प्राचार्य संतोष चव्हाण साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाचे महत्त्व, संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्ये तसेच लोकशाही मूल्ये, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या संविधानाच्या मूलभूत तत्त्वांविषयी मार्गदर्शन केले.

संविधान दिनानिमित्त शाळेत प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी संविधानविषयक घोषवाक्ये देत



नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून संविधानाचा सन्मान आणि लोकशाही मूल्यांचा प्रसार करण्याचा संदेश दिला.

तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात देशाचे रक्षण करताना शहीद झालेल्या वीर जवानांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या शौर्य, त्याग आणि बलिदानाचे स्मरण करून देशाच्या सुरक्षेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीरांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास प्राथमिक , माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सुरेश कोकाटे सर व श्री बिळेणसिद्ध हक्के सर यांनी उपस्थितांचे आभार मानले संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

पान १ वरून....

शेख बिलाल केला आहे.

शेख कासिफ यांच्यासह सर्वच पत्रकारांसोबत सलोख्याचं नातं

शेख काशिफ हे माझे जुने मित्र आहेत, त्यांच्याविषयी मनात काहीच नसुन मी त्यांना हक्काने बोललो, त्यामध्ये अनावधानाने झालेल्या प्रकाराबद्दल मी दोन दिवसांपुर्वी दिलगिरी देखील व्यक्त केलेली आहे. आजवरच्या माझ्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीत पत्रकारांचे मोठे योगदान राहिलेले आहे. मार्गदर्शकांच्या रूपात हे योगदान कायम सोबत राहिलचं. शेख काशिफ यांच्यासह सर्वच पत्रकारांसोबत माझे सलोख्याचे आणि स्नेहाचे नाते आहे. तरी अनवधानाने माझ्या शब्दामुळे भावना दुखावल्या असतील तर मी दिलगीर व्यक्त करतो, असे शेख बिलाल मेंबर यांनी म्हटले आहे.

.....

लोकार्पण

विभागांच्या १७४ सेवा व प्रकल्पांचे लोकार्पण झाले. त्यावेळी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे बोलत होत्या. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, मंत्री ॲड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव तसेच समग्र आणि माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

लाभार्थ्यांना योजनेचा थेट लाभ

पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, राज्य शासन विविध योजनांचे लाभ थेट लाभ हस्तांतरणाद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचवत आहे. या लाभांसोबतच नागरिकांची कार्यक्षमता, स्वावलंबन आणि स्वतःच्या कर्तृत्वावर प्रगती करण्याची इच्छा कायम राहणे आवश्यक आहे. ग्रामीण युवकांनी रोजगार मागण्याऐवजी स्वयंरोजगार निर्माण करावा आणि उद्योजक म्हणून पुढे यावे, हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. पशुसंवर्धन विभागाने योजनेचे सादरीकरण केल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी पहिल्याच अर्थसंकल्पात या योजनेसाठी तरतूद केली. विभागाने महाआयटीच्या सहकार्याने योजनेसाठी आवश्यक ऑनलाइन प्रणाली विकसित करून तिच्या चाचण्या पूर्ण केल्या आहेत. अर्जापासून लाभ वितरणापर्यंतची प्रक्रिया ऑनलाइन आणि पारदर्शक राहणार आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावरील प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे योजनेच्या प्रक्रियेला काही काळ स्थगिती देण्यात आली होती. आता योजनेचा प्रारंभ झाला असून प्रत्येक जिल्ह्यासाठी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. ऑनलाइन अर्जांमधून प्राप्त होणाऱ्या प्रतिसादाच्या आधारे पशुधन व्यवसायाचे समूह कोणत्या भागांत उभारता येतील, याचे नियोजन विभाग करणार आहे. हा योजनेच्या पुढील टप्प्याचा भाग असेल, असे मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. या योजनेत ५० टक्के अनुदानाची तरतूद असून महिला तसेच अनुसूचित जाती-जमातीतील लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान मिळेल. दूध, अंडी, कुक्कुटपालन, मांस उत्पादन आणि वराहपालन या क्षेत्रांत पशुधन व्यवसायाचे समूह विकसित करण्यावर विभाग भर देणार आहे. आदिवासी भागांत वराहपालन व्यवसायाला मोठी संधी असून स्थानिक युवकांना त्याद्वारे उद्योजकतेकडे वळवता येईल. पशुधन उत्पादनाच्या विविध क्षेत्रांत महाराष्ट्राला देशात आघाडीचे राज्य बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. लाभार्थ्यांनी स्वतः प्रयत्न करून व्यवसाय उभारावा आणि उत्पन्नाचे शाश्वत साधन निर्माण करावे, अशी या योजनेची रचना आहे. तरुण पिढीला केवळ अनुदान देण्याऐवजी त्यांना स्वतःची उपजीविका उभारण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. ग्रामीण युवकांच्या प्रयत्नांना शासनाच्या आर्थिक मदतीची जोड देऊन पशुधन क्षेत्रातील उद्योजकांची नवी पिढी घडविण्यात येईल, असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

अर्जासाठी महाआयडी आवश्यक

अर्जासाठी फार्मर आयडी अनिवार्य नसून महाआयडी आवश्यक आहे. अर्जदारांची आवश्यक माहिती स्वयंचलितरीत्या प्राप्त करण्याचे नियोजन विभागाने केले आहे. त्यामुळे अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ होऊन योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखता येणार आहे. लोकप्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत प्राप्त सूचनांचा योजनेच्या अंमलबजावणीत विचार करण्यात येत आहे. आकांक्षित तालुक्यांना अधिक प्रोत्साहन द्यावे आणि तेथे निश्चित उद्दिष्टाचे बंधन ठेवू नये, अशी सूचना ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केली.

.....

चोरी

मोठ्या संख्येने भाविक येथे साईबाबांच्या दर्शनासाठी येतात. परळी शहरासह पंचक्रोशीतील साईभक्तांना या मंदिराच्या माध्यमातून एक नवीन श्रद्धास्थान उपलब्ध झाले आहे. मात्र, ज्या मंदिरात भाविक श्रद्धेने नतमस्तक होतात, त्याच मंदिरात चोरीचा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. चुकीच्या मार्गाने पैसे मिळविण्यासाठी काही व्यक्ती कोणत्या थराला जातील, याचा अंदाज बांधणेही कठीण झाले आहे. दर्शनाच्या निमित्ताने मंदिरात आलेल्या अज्ञात व्यक्तीकडून चोरी झाल्याचा प्रकार सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे. मंदिरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. ग्रामीण पोलिसांनी गस्त वाढवावी परळी वैजनाथ ते चांदापूर मार्गे घाटनांदूरकडे जाणारा रस्ता असल्याने या परिसरात नागरिकांची व वाहनांची नियमित वर्दळ असते. मंदिरात दररोज भाविकांची ये-जा सुरू असते. त्यामुळे मंदिर परिसरासह चांदापूर मार्गावर ग्रामीण पोलिसांनी नियमित गस्त वाढवावी. तसेच अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी मंदिराचे विश्वस्त व पुजारी यांनी केली आहे. श्रद्धा आणि भक्तीचे केंद्र असलेल्या श्री साईबाबा मंदिरात घडलेल्या या चोरीच्या प्रकाराची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेऊन सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घ्यावा आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा साईभक्तांकडून व्यक्त होत आहे.

.....

खा.बजरंग सोनवणे

देण्यात आल्याने जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. जिल्ह्यातील रेल्वे मार्गाची सद्यस्थिती, सुरू असलेल्या कामांची प्रगती तसेच केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या रेल्वे व रस्ता सुरक्षा विषयक प्रस्तावांचा या बैठकीत सखोल आढावा घेतला जाणार आहे. अपघात रोखण्यासाठीच्या उपाययोजना आणि विकासकामांतील अडथळे दूर करण्यावर खा.सोनवणेंचा भर राहणार आहे. आपल्या समस्या, आमचा पाठपुरावा या भूमिकेतून खा.बजरंग सोनवणे यांच्या संपर्क कार्यालयाने नागरिकांना साद घातली आहे. आपल्या भागातील रस्ते, वाहतूक कोंडी, रेल्वे सुरक्षा किंवा इतर विकासकामांबाबत काही तक्रारी, समस्या अथवा सूचना असल्यास नागरिकांनी लेखी निवेदन व आवश्यक कागदपत्रांसह ९४७७१६१६१६ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावेत. नागरिकांचे हे प्रश्न संबंधित बैठकीत मांडून त्यावर ठोस कार्यवाहीसाठी पाठपुरावा केला जाईल, असे आवाहन खासदार संपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

असे असेल बैठकांचे वेळापत्रक

सोमवार, दि.३० नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दिवसभर या बैठकांचे सत्र चालणार आहे. सकाळी ११ वाजता जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) बैठक, दुपारी ३.३० वाजता रेल्वे सुरक्षा समिती बैठक, दुपारी ४.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समिती बैठक आयोजीत केली आहे.

शेवटच्या पानावरून...

उपोषण

तात्कालीन उपविभागीय कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक श्रीमती चव्हाण यांनी केलेल्या गैरव्यवहारांच्या अनुषंगाने कृषि आयुक्त श्री. बिनवडे यांनी सप्टेंबर २०२४ मध्ये ड्रौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्या आदेशांची नेमकी अंमलबजावणी का झाली नाही? असा प्रश्न उपस्थित करीत प्रकरणातील प्रस्तावित रकमांची वसुलीही होऊ न शकल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात विविध महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या असून, तात्काळ कारवाई होण्यासाठी उपोषण करीत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

.....

शिवसेना

घ्यावा. किरकोळ भाजीपाला व फळ विक्रेत्यांकडून होणारी दररोजची २० रुपयांची वसुली तात्काळ स्थगित करून याबाबत योग्य आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. सदरील निवेदन देताना शिवसेनेचे शहरप्रमुख वैजनाथ माने, प्रतीक मुंडे, उपशहरप्रमुख विठ्ठल गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते दीपक जोशी, मनोज चव्हाण, नारायण अदाटे व अनिकेत माने आदी उपस्थित होते तसेच या निवेदनाची एक प्रत उपविभागीय अधिकारी व तहसीलदार परळी वैजनाथ यांना ही देण्यात आलेली आहे. छोट्या व्यावसायिकांच्या हितासाठी शिवसेनेने पुढाकार घेतल्याने या मागणीला महत्त्व प्राप्त झाले असून, बाजार समिती प्रशासन या निवेदनाची दखल घेऊन दैनंदिन वसुली बंद करण्याबाबत कोणता निर्णय घेते, याकडे परळी शहरातील किरकोळ विक्रेते आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

.....

वानटाकळी

ठरावाच्या बाजूने, तर २५६ मते सरपंचांच्या समर्थनार्थ पडली. अशा प्रकारे केवळ दोन मतांच्या फरकाने अविश्वास ठराव मंजूर झाला आणि सरपंच गंगूबाई हंगे यांना आपले पद गमवावे लागले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या मतदानात शेवटपर्यंत उत्सुकता कायम होती. मात्र, अंतिम निकालाने सरपंचांच्या विरोधकांचे पारडे जड ठरले. अवघ्या दोन मतांनी लागलेल्या या निकालाची चर्चा आता संपूर्ण परळी तालुक्यात रंगू लागली आहे.

.....

'माय महोत्सव'

दैनिक सोमेश्वर साथीचे संपादक बालासाहेब फड, अमरजी रोडे, राजेभाऊ काळे, साहेबराव रोडे, दीक्षित रोडे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला टोकवाडी व परिसरातील बौद्ध उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शन योग प्रशिक्षक संभाजी मुंडे यांनी केले, तर कार्यक्रमाचे व्यवस्थापन संतोष मुंडे यांनी पाहिले. आई लक्ष्मी जनार्धन मुंडे यांच्या अमृतदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवातून सामाजिक एकोपा, महामानवांच्या विचारांचा प्रसार आणि समाजहिताची भावना अधोरेखित करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या भूमिपूजनामुळे गावाच्या सामाजिक आणि वैचारिक जडणघडणीला नवी दिशा मिळणार असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. या सोहळ्यास गावातील सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून महोत्सवाची शोभा वाढवली.

.....

'फार्मर आयडी'

राहण्याची भीती व्यक्त होत आहे. केवळ सातबारा नाही म्हणून शेतकऱ्यांना योजनांपासून वंचित ठेवू नका! अशी ठाम भूमिका महासंघाने निवेदनातून मांडली आहे. सन २०१६ पूर्वीपासून शासकीय जमीन कसत असल्याचे पुरावे असलेल्या शेतकऱ्यांना विशेष तरतुदीद्वारे फार्मर आयडी देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यासाठी ग्रामपंचायत दाखला, जुने पीक पाहणी अभिलेख, पीकपेरणी नोंदी, वीज जोडणीची कागदपत्रे, कर भरल्याच्या पावत्या व अन्य उपलब्ध पुरावे ग्राह्य धरण्यात यावेत. तलाठी, मंडळ अधिकारी व तहसीलदार यांच्यामार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी करून शेतकऱ्यांची पडताळणी करावी. फार्मर आयडी मिळेपर्यंत पात्र शेतकऱ्यांना पीक विमा व कृषी अनुदानापासून वंचित ठेवू नये. तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, तहसीलदार व कृषी विभागाला स्पष्ट मार्गदर्शक सूचना देऊन विशेष शासन परिपत्रक काढावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय जिल्हास्तरावर विशेष नोंदणी व तक्रार निवारण शिबिरे आयोजित करून गरीब, भूमिहीन व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली आहे. वर्षानुवर्षे जमिनीत घाम गाळणारा शेतकरी केवळ कागदपत्रांच्या अभावामुळे सरकारी योजनांपासून वंचित राहणे ही अन्यायकारक बाब आहे. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी अपेक्षा नानासाहेब घोडके यांनी व्यक्त केली. या निवेदनावर युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, जिल्हा सचिव ॲड. दत्ता जाधव, जिल्हा उपाध्यक्ष बालासाहेब गवळी, जिल्हा कार्याध्यक्ष राधाकिसन भाळशेंकर, तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, अर्जुन पोहेकर, शहराध्यक्ष संतोष खंडागळे, सल्लागार बंडू सोनवणे, भरत घडशिंगे, अशोक घडशिंगे, महादेव घडशिंगे, नामदेव पोहेकर, रोहिदास वाघमारे, नानाभाऊ वाघमारे, महादेव भिसे, बाळू घडशिंगे, ईश्वर घडशिंगे, आदित्य घडशिंगे आदींची नावे आहेत.

.....

महाशिबिर

शिबिरात या तपासण्या मोफत

रक्तदाब, रक्तशर्करा, एचबीए१सी (तीन महिन्यांची सरासरी रक्तशर्करा), मूत्रपिंडाची तपासणी, रक्तातील चरबी, शरीरातील चरबीचे प्रमाण, पायांच्या नसांची तपासणी, ईसीजी, थायरॉईड आणि युरिक ॲसिड अशा विविध तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत. अंबाजोगाई ,केज, परळी,धारूर सह परिसरातील नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

.....

पुस्तकांचे वाटप

शिक्षण थांबू नये, शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येकाला प्रगतीची संधी मिळावी, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. पुस्तकांचे वाटप झाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असून, शिक्षणाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या वेळी शाळेतील शिक्षक, कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

.....

संविधान दिन

करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.अतुल दुबे, प्रा.ए.ए.मुंडे, प्रा.यू.एन.फड, प्रा.पी.पी.तिडके, प्रा.ए.डी.शेख, प्रा.एस.के.अप्पार, प्रा.पी.पी. परळीकर, एस .बी. अष्टेकर, यू.बी. जगताप यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामूहिक संविधान वाचनातून संविधानाप्रती आदर व्यक्त करत महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.

.....

सनराईज इंग्लिश स्कूल

सांस्कृतिक विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले तर सूत्रसंचलन हे अभय मुंडे आणि साक्षी फड या विद्यार्थांनी केले,यावेळी पाहुण्यांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेतचे पारितोषिक वितरण करण्यात आले . तसेच इंग्रजी विषयाच्या सौ पूजा बिडवे यांना महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती पुणे येथे इंग्रजी माध्यमाच्या इ. सातवी इंग्रजी विषयाच्या पुस्तकाचे परीक्षण केल्याबद्दल शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला ,शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते खेळाची मशाल पेटून आणि श्रीफळ फोडून क्रीडा सप्ताहाची पुढील वाटचाल सुरू करण्यात आली. तसेच विविध खेळांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंचा परिचय करून देण्यात आला. या उद्घाटन सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, आनंद आणि क्रीडास्पर्धांमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा निर्माण झाली. शाळेच्या वतीने सर्व प्रमुख पाहुण्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. क्रीडा सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण होऊन त्यांच्यातील सुप्त क्रीडागुणांना वाव मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

जाहीरनामा

कार्यालय नगर परिषद, किल्ले धारुर जि.बीड
क्र.२५५१/किनप/नांव लावणे (गुंठेवारी)

दिनांक २६ नोव्हेंबर २०२६
प्रकरण महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २०२१ चे कलम ४ (१) अन्वये
अर्ज श्री भारत दगडूबा थावरे
प्रकरण :- सर्व्हे नं. १/३/आ वर खरेदीखत /सातबारा/ वारसा पत्रक क्र.४४४०/२००१
साईन ३०X २५ लांबी पु.प.३० रूंदी द.उ.२५ ६९.०० चौ.मी. अन्वये
श्री भारत दगडूबा थावरे यांचे नांव लावणे संबंधी सर्वास जाहिर करण्यात येते की,
श्री भारत दगडूबा थावरे
ज्याचे नांव रजिस्टर महसुल जायदादला आहे. हे बदलण्यास इसम मजकुरने अर्ज दिला आहे. या विषयी ज्या कोणास तक्रार असेल त्यांनी या जाहीर नाम्याच्या प्रसिध्दी पासुन (१५) पंधरा दिवसाचे आत या कार्यालयात आपला तक्रारी अर्ज द्यावा नसता मुदत संपल्यावर कायद्याप्रमाणे रजिस्टर महसुल जायदादला अर्जा प्रमाणे नांव बदलण्यास येईल. आणि मग कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
चतुर : सिमा
पुर्व : नारायण दंगडू थावरे
पश्चिम : साहेबराव शिंदे
दक्षिण : रस्ता
उत्तर : आबाराव आत्याबा खडके
तपशील

मुख्याधिकारी
नगर परिषद, किल्ले धारूर

जाहीर प्रगटन

परळी शहर व तालुक्यातील आणि सिरसाळा येथील तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे १. मोहम्मद हारुण सय्यद रा. हमालवाडी, परळी वै. जि. बीड. २. आरेफ पिता रईस कुरेशी रा. कुरेशी नगर, परळी वै. जि. बीड यांनी आमच्या ऑफिसवर येऊन माहिती, सुचना व कागदपत्र दिल्यावरुन तसेच अधिकार दिल्यावरुन सदर जाहिर प्रगटन देण्यात येते की, मिर्झा सलमान महेफुज बेग रा. सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड यांना त्यांचे नांवावरील जमीन विक्री करावयाची असल्याने आमचे पक्षकाराची त्यांच्या सोबत ओहख झाली व त्यांनी त्यांचे नांवावरील मौजे सिरसाळा येथील जमीन गट क्र. ६८ मधील एकुण क्षेत्र ०७ हेक्टर ८२ आर जमीनीपैकी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर जमीन जिची चतुर्सिम पुर्वेस -नोमाण महेफुज बेग, पश्चिमेस - देशमुख यांची जमीन, दक्षिणेस पोहनेर रस्ता व २० फुट रुंदीचा रस्ता व उत्तरेस- बालाजी कैलास ढेंबरे यांची जमीन., वरील चतुसिमेच्या आतील संपुर्ण ०२ हेक्टर ०० आर जमीन आमचे पक्षकारास दि. ०५.०२.२०२५ रोजी कायमस्वरुपी विक्री करण्याचा ठराव नोटरी रजि. दस्त क्र. १८२/२०२५ अन्वये केला व सदर दिवशी आमचे पक्षकाराने मिर्झा सलमान महेफुज बेग यांना ईसारापोटी रक्कम रु. ३,००,०००/- अक्षरी तीन लाख रुपये दिले आहेत व त्यांनी आमचे पक्षकाराच्या हक्कात रक्कम मिळाल्या बाबतची रशीद पावती व ईसारपावती लिहून दिलेली आहे व आमचे पक्षकाराचा प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन ताबा व कब्जा मिर्झा सलमान महेफुज बेग यांनी करुन दिलेला आहे व तेंव्हापासून आमचे पक्षकार हे सदरील शेत जमीनीचा वापर व उपभोग घेत आहेत व आज रोजी सदरील शेत जमीन आमचे पक्षकाराच्या ताबे कब्जेउपभोगात आहे. आमचे पक्षकाराने मिर्झा सलमान महेफुज बेग यांना बाकी राहिलेली रक्कम स्विकारुन रितसर खरेदीखत आमचे पक्षकाराच्या नांवे करुन द्यावे असे बऱ्याच वेळा तोंडी व नोटीसव्दारे कळविलेले आहे. परंतु असे असतांना सुध्दा मिर्झा सलमान महेफुज बेग हे महसूल अभिलेखात त्यांचे नांवाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवून सदरची शेत जमीन मिळकत जास्तीची रक्कम घेवून आमचे पक्षकाराच्या हक्कात खरेदीखत करुन न देता त्यांचे परस्पर ईतर कोणासही विक्री, हस्तांतरण, गहाण, तारण, बक्षीस, ईसारपावती, दानपत्र करण्याच्या प्रयत्नात आहेत किंवा सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेचे, व्यक्तीचे कर्ज घेण्याच्या तयारीत आहेत व तसे झाले तर आमचे पक्षकाराचे कधीही न भरुन येणारे असे आतोनात नुकसान होणार आहे.

तरी सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मिर्झा सलमान महेफुज बेग रा. सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड यांचे बरोबर वर दर्शविलेल्या मिळकती बाबत कोणीही खरेदी, विक्री, हस्तांतरण, गहाण, तारण, बक्षीस, ईसारपावती किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करु नये. तसा केल्यास त्याचे खर्चाची व परिणामाची सर्वस्वी जबाबदार ही संबंधीत व्यक्तीवर राहिल याची नोंद घ्यावी. सबब हे जाहिर प्रगटन देण्यात येते.

दि. २१/११/२०२६.

जाहिर प्रगटन देणार

मार्फत :-
ॲड.वाय.आर.सय्यद
न्यायालय, परळी वैजनाथ.
मो. क्र. ९९२३१४९७८६.

१. मोहम्मद हारुण सय्यद

२. आरेफे पिता रईस कुरेशी

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ — पान नं.३

कर्तव्य बजावताना मृत्यूची झडप; माजी सैनिक सदाशिव शेळके यांचे अपघाती निधन

मंठा । प्रतिनिधी



भारतीय सैन्यदलात तब्बल १७ वर्षे देशसेवा करून निवृत्त झाल्यानंतरही सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत राहून कर्तव्य बजावणाऱ्या माजी सैनिकाचा अपघाती मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. बोरगाव (ता. जि. जालना) येथील सदाशिव उद्धवराव शेळके यांचे पनवेल येथील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाने बोरगाव परिसरात शोककळा पसरली आहे.

सदाशिव शेळके यांनी भारतीय थलसेनेच्या आर्टिलरी रेजिमेंटमध्ये तब्बल १७ वर्षे देशसेवा केली. २०१९ मध्ये ते सैन्यदलातून निवृत्त झाले होते. मात्र, देशसेवेनंतरही कर्तव्याची ओढ कायम ठेवत त्यांनी २०२२ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर नियुक्ती स्वीकारली. सध्या ते उरण येथे कार्यरत होते.

दरम्यान, कामाच्या ठिकाणी पाहणी (व्हिजिट) करण्यासाठी दुचाकीवरून जात असताना एका भरधाव कॅन्टरने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना सोमवारी पनवेल येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, मृत्यूशी सुरू असलेली त्यांची झुंज अपयशी ठरली. मंगळवारी सकाळी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी १० वाजता त्यांच्या मूळ गावी बोरगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, आई-वडील असा मोठा परिवार आहे. १७ वर्षे देशाच्या रक्षणासाठी आणि निवृत्तीनंतरही सार्वजनिक कर्तव्यासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या सदाशिव शेळके यांच्या अकाली निधनाने एका कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्त्वाला बोरगाव मुकले आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा घनसावंगी तालुका दौरा; ऊसतोड कामगारांशी साधला संवाद

एमआयडीसी क्षेत्र, नगर पंचायत आणि 'नमो गार्डन'ची केली पाहणी

जालना । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज घनसावंगी तालुक्याचा दौरा करून घनसावंगी परिसरातील ऊसतोड कामगारांच्या ऊस तोडणी शेतात जाऊन त्यांची भेट घेत संवाद साधला. यावेळी त्यांनी कामगारांचे राहणीमान, पिण्याच्या पाण्याची सोय, आरोग्य सुविधा आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतची सद्यस्थिती जाणून घेतली. ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने पावले उचलावीत, अशा सूचना त्यांनी यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

तालुक्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांनी घनसावंगी येथील प्रस्तावित एमआयडीसी क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली. जागेची उपलब्धता, रस्ते, वीज आणि पाण्यासारख्या मूलभूत पायाभूत सुविधांच्या उभारणीबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. औद्योगिक प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. यानंतर जिल्हाधिकारी मित्तल यांनी घनसावंगी नगर पंचायत कार्यालयास भेट देऊन विविध विभागांच्या कामकाजाची पाहणी केली. शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्थापन, कर संकलन आणि प्रलंबित विकासकामांचा त्यांनी आढावा घेतला.

नागरिकांना दैनंदिन सेवा सुलभ आणि पारदर्शकपणे मिळाव्यात, यासाठी दप्तर दिरंगाई टाळून कामे वेळेत पूर्ण करण्याची तंबी त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिली. दौऱ्याच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी घनसावंगी येथील 'नमो गार्डन'ला भेट देऊन तेथील सुशोभीकरण आणि उपलब्ध सोयी-सुविधांची पाहणी केली. उद्यानातील स्वच्छता, वृक्षारोपण, लहान मुलांची खेळणी आणि नागरिकांसाठी असलेल्या सुविधांची देखभाल नियमितपणे राखली जावी, जेणेकरून नागरिकांना विरंगुळ्यासाठी एक उत्तम ठिकाण उपलब्ध राहील, असे त्या म्हणाल्या. या दौऱ्याप्रसंगी, घनसावंगीचे तहसीलदार, नगर पंचायत मुख्याधिकारी, पोलिस निरीक्षक तसेच संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



अंबड नगरपरिषदेची धडक कारवाई; सर्व्हे क्र. ८ मधील अतिक्रमण काढले

अंबड । ज्ञानेश्वर साळुंके



अंबड नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नंबर ८ मधील जागेवर असलेले अनधिकृत अतिक्रमण आज (दि.२६ नोव्हेंबर) नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने पोलीस प्रशासनाच्या मदतीने हटवण्यात आले. भटके विमुक्त श्रीनाथ गोसावी सेवा संस्था, अंबड या संस्थेचे उपाध्यक्ष व सदस्यांनी संस्थेच्या ठरावाद्वारे सर्व्हे नंबर ८ मधील जागेवरील अतिक्रमण हटवण्याबाबत नगरपरिषद प्रशासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत नगरपरिषद प्रशासनामार्फत संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

पाहणीदरम्यान आढळून आलेल्या अतिक्रमणधारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (MRTP Act, 1966) मधील तरतुदीनुसार नोटिसा बजावून विहित मुदतीत जागेच्या मालकी हक्कासंदर्भातील वैध कागदपत्रे कार्यालयात सादर करण्याचे कळविण्यात आले होते. मात्र, मुदत संपूनही एकाही अतिक्रमणधारकाने मालकी हक्क सिद्ध करणारी कागदपत्रे सादर केली नाहीत. अखेर कागदपत्रांची तपासणी करून आज पोलीस बंदोबस्तात हे अनधिकृत अतिक्रमण काढून जागा मोकळी करण्यात आल्याची माहिती अंबड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

बिल्ले ठोकण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची; मग चारा बियाण्यांसाठी शेतकऱ्यांची अडवणूक का?

दुष्काळात पशुधन संकटात; पशुसंवर्धन विभागाच्या अटींवर शेतकऱ्यांचा संताप

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, शेतीतून उत्पन्न नाही, जनावरांसाठी हिरवा चारा उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत पशुधन जगविण्यासाठी शेतकरी चारा बियाणे मिळविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या दारात जात असताना तेथेही नव्या अटींचा अडसर निर्माण होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. पशुसंवर्धन विभागाकडून चारा बियाण्यांची मागणी करण्यासाठी गेलेल्या पशुपालक शेतकऱ्यांना तुमच्या जनावरांच्या कानात बिल्ला (ईअर टॅगिंग) असेल तरच चारा बियाणे मिळेल, अन्यथा मिळणार नाही, असे सांगितले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे. त्यामुळे आधीच दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांसमोर नवी अडचण उभी राहिली आहे.

विशेष म्हणजे, महाराष्ट्र शासनाने २७ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्यातील सर्व पशुधनाचे ईअर टॅगिंग करून भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करणे बंधनकारक केले आहे. या मोहिमेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी आणि पशुधन पर्यवेक्षक यांच्यावर सोपविण्यात आली होती. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पशुधनाचे टॅगिंग करून त्याची ऑनलाइन नोंदणी करणे अपेक्षित होते.

मग प्रश्न असा उपस्थित होतो की, ज्या जनावरांना आजपर्यंत बिल्ले लावण्यात आले नाहीत, त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी वेळेत टॅगिंगची कार्यवाही पूर्ण केली होती का? जर विभागाच्या स्तरावर टॅगिंग अपूर्ण राहिले असेल तर त्याचा फटका आता दुष्काळग्रस्त पशुपालक शेतकऱ्यांना का बसावा?

शेतकऱ्यांच्या दृष्टीने आणखी महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, जनावरांच्या कानातील बिल्ला गळून पडला असेल, नवीन वासराचा जन्म झाला असेल किंवा नवीन जनावर खरेदी केले असेल तर अशा परिस्थितीत विभागाकडून तातडीने बिल्ला लावून ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे का? दुष्काळाच्या काळात पशुधन वाचविणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. शेतकऱ्यांकडे जनावरांसाठी चारा उपलब्ध नाही. अशा वेळी विभागाने शेतकऱ्यांना अडविण्याऐवजी अपूर्ण टॅगिंग पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबवून चारा बियाणे वाटपाची प्रक्रिया सुलभ करणे अपेक्षित आहे.

पशुसंवर्धन विभागाने स्पष्ट करावे!

मंठा तालुक्यातील एकूण किती पशुधनाचे ईअर टॅगिंग पूर्ण झाले आहे? किती जनावरे अद्याप बिल्ल्याविना आहेत? संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील टॅगिंग पूर्ण केले होते का? चारा बियाणे वाटपासाठी ईअर टॅगिंग अनिवार्य करण्याचा नेमका कोणता शासन निर्णय किंवा योजनेचा निकष आहे? बिल्ला नसलेल्या जनावरांना तातडीने बिल्ला लावून नोंदणी करण्याची सुविधा शेतकऱ्यांना दिली जात आहे का? विभागाच्या दिरंगाईमुळे टॅगिंग राहिले असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार का?

शेवटी प्रश्न एकच...

जनावरांना बिल्ले लावण्याची जबाबदारी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांची होती, तर त्या कामातील त्रुटींची शिक्षा दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांना कशासाठी? शेतकऱ्यांना चारा बियाणे देण्यापेक्षा नियमांच्या अटी दाखवून परत पाठविणे हा पशुधन संवर्धनाचा मार्ग आहे का? आता तरी वरिष्ठ पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी या प्रकरणात लक्ष घालून शेतकऱ्यांची अडवणूक थांबवावी, अशी मागणी होत आहे.

आरोग्य सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी मंत्री प्रकाश आबिटकर यांचा जालनातून आरोग्य संवाद

आरोग्य संवाद यात्रेअंतर्गत आरोग्य संस्थांची पाहणी, आरोग्य योजनांचा आढावा आणि पदाधिकारी व अधिकारी यांच्याशी संवाद

जालना । प्रतिनिधी

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी, लोकाभिमुख आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या वतीने दि. १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'आरोग्य संवाद यात्रा' राबविण्यात येत आहे. या यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत कितपत पोहोचत आहे, आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध सुविधांचा दर्जा, नागरिकांचे अनुभव आणि आरोग्य सेवांमधील अडचणी जाणून घेण्यात येणार आहेत. या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री श्री. प्रकाश आबिटकर हे शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येऊन आरोग्य यंत्रणेचा सविस्तर आढावा घेणार असून विविध स्तरांवरील पदाधिकारी, अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि लाभार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

मंत्री श्री. आबिटकर हे दि. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी मुंबई येथून जालना कडे प्रयाण करणार आहेत. यावेळी ते जालना येथील एम सी एच विंग जिल्हा महिला रुग्णालय जालना येथे भेट देऊन उद्घाटन करणार आहेत. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालय, अंबड व घनसावंगी येथे भेट देऊन उद्घाटन करणार आहेत व कामकाजाचा आढावा घेणार आहेत. एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती व जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कार्यरत आरोग्य समित्यांच्या पदाधिकारी व अधिकारी यांच्याशी आरोग्य संवाद दूरदृश्य प्रणाली द्वारे जिल्हा परिषद जालना येथे होणार आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालय कुंभेफळ जिल्हा जालना येथील इमारत व बांधकामाची पाहणी करणार आहेत. या संवादाच्या माध्यमातून आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी, स्थानिक पातळीवरील अडचणी आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात येणार आहे. जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानासह 'तिशीचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' या उपक्रमाचाही आढावा घेण्यात येणार आहे. आरोग्य संस्थांमधील औषधसाठा, वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता, मनुष्यबळ, स्वच्छता, पाणीपुरवठा, जैववैद्यकीय कचऱ्याचे संकलन व शास्त्रोक्त विल्हेवाट, संदर्भ सेवा, रुग्णवाहिका व्यवस्था, बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा तसेच लसीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी या बाबींची सविस्तर तपासणी करण्यात येणार आहे.

आरोग्य संवाद यात्रेचा मुख्य उद्देश केवळ आरोग्य संस्थांची पाहणी करणे नसून, नागरिकांना प्रत्यक्ष मिळणाऱ्या आरोग्य सेवांचा अनुभव जाणून घेऊन त्यातील त्रुटी दूर करणे, चांगल्या उपक्रमांना प्रोत्साहन देणे आणि आरोग्य यंत्रणेची कार्यक्षमता वाढविणे हा आहे. नागरिकांच्या सूचना व अनुभवांच्या आधारे आरोग्य सेवा अधिक दर्जेदार, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्यासाठी या यात्रेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहेत.

माहोरा बसस्थानक अतिक्रमणांच्या विळख्यात; पोलिस प्रशासनासह बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

जाफराबाद । रामेश्वर शेळके



जाफ्राबाद तालुक्यातील माहेरा येथे अनधिकृत वाहने आणि नागरिकांवर होणारी दादागिरी, रिक्षाचालकांचा अड्डा आणि अतिक्रमणांचा दिवसेंदिवस वाढत चाललेला विळखा या सर्व बाबींमुळे माहोरा बसस्थानक मृत्युचा सापळाच बनला आहे. अतिक्रमांमुळे रस्त्याचा बहुतांशी भाग व्यापला गेल्याने वाहन चालविण्या सोबतच पायी चालणेही मुश्कील झाले आहे.

फूटपाथ बनलेत व्यावसायिकांचा अड्डा.!

विशेष म्हणजे बहुतांशी व्यावसायिकांनी फूटपाथवरच त्यांचा व्यवसाय थाटला आहे. काहीनी तर रस्त्यावरच केळच्या हातगाडया पानटपरी बसवीले त्यामुळे नागरिकांना रस्त्याच्या कडेनेच चालत जावे लागते. त्यातूनच आतापर्यंत छोटे मोठे अपघात घडले आहेत. परिसरातील वाहतूककोंडी होत असते, बसेस या परिसरातून गेल्या असल्या तरी त्यांच्या त्यांच्या जागा अद्याप सोडलेल्या नाहीत. त्यांच्याकडून स्टूल आणि टेबल टाकून रस्त्याच्या कडेलाच दुकानदारी' सुरू आहे. काही एजटांनी त्यांचे व्यवसाय फूटपाथवरच मांडले आहेत. परंतु हे सर्व दिसत असूनही पोलीस,प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही.

शुक्रवारी माहोरा येथे आठवडी बाजार असल्याने चौकात मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. त्यामुळे हे अंतर पार करण्यासाठी वाहनांना किमान पंधरा ते वीस मिनिटांचा कालावधी लागतो

अतिक्रमणांमुळे परिसरात छोटे मोठे अपघात घडले आहेत. अतिक्रमणांनी विळखा घातला आहे त्यामुळे बस वळविताना वाहनचालकांना त्रास होत आहे. त्याबाबत तक्रारी आल्यानंतर प्रशासनाच्या वतीने या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात नाही. वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. हे वास्तव असतानाही पोलीस अथवा सार्वजनिक बाधकाम प्रशासनाकडून या अतिक्रमणांवर कोणतीही कारवाई का केली जात नाही असा सवाल उपस्थित होत आहे.

केहाळ वडगाव शाळेत संविधान दिनाचा जागर; विद्यार्थ्यांची गावातून जनजागृती रॅली



मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील केहाळ वडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी गणवेश परिधान करून गावातून जनजागृती रॅली काढली. या रॅलीच्या माध्यमातून भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आले.

रॅलीनंतर शाळेच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश दवणे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच भारतीय संविधानालाही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत, संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन आणि संविधाननिष्ठेची प्रतिज्ञा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या संविधानिक मूल्यांवर आपली मनोगते व भाषणे व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या भाषणातून संविधानाविषयी जागरूकता आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक व्ही.एम.कांबळे यांनी केले तर मुख्याध्यापक डी. डी. भुस्कुटे यांनी उपस्थितांचे मार्गदर्शन केले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश दवणे, ग्रामपंचायत अधिकारी विष्णू जाधव, विष्णू सिरसाट, विजय दवणे, अशोक रणवीर, वसंत हरबक, सिद्धेश्वर दवणे, प्रशांत दवणे, विनोद दवणे यांच्यासह पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी आदर, लोकशाहीची जाणीव आणि सामाजिक समतेची भावना रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेतील त्रुटी पूर्तता करण्याची सोमवारपर्यंत संधी

जालना । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत सन २०२२-२३ व २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील ऑनलाइन अर्जांमध्ये त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांना त्रुटींची पूर्तता करण्यासाठी शेवटची संधी देण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी सोमवार, दि.३० नोव्हेंबरपर्यंत आवश्यक कागदपत्रे व अर्जातील त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळावे, या उद्देशाने शासनामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार देय असलेली रक्कम त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात जमा केली जाते. या योजनेतील संबंधित विद्यार्थ्यांच्या अर्जातील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी यापूर्वीही कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्यात आला होता. तसेच याबाबत वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे.

सन २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीतील ऑनलाइन अर्जांमध्ये त्रुटी असलेल्या लाभार्थ्यांनी विहित मुदतीत त्रुटींची पूर्तता करून आवश्यक कागदपत्रे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना येथे सादर करावीत. ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत त्रुटींची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज नस्तीबद्ध करण्यात येतील. त्यानंतर त्रुटी पूर्ततेची कोणतीही संधी दिली जाणार नाही. तसेच योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील, अशी माहिती त्यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

रांजणी येथील जिल्हा परिषद शाळेत संविधान दिन साजरा

रांजणी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दिनांक २६ नोव्हेंबर गुरुवार रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संविधान उद्देशिका वाचून संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिभाऊ पाटोळे, संतोष कुहिरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार खुळे, सचिन पाटोळे, लक्ष्मण पाटोळे, मुख्याध्यापक फुलाजी जोगदंड, लक्ष्मण कातारे, मुनाफ कुरेशी, अमृता कुलकर्णी, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सीईटी विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र अर्जातील त्रुटींची पूर्तता करावी

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे विद्यार्थ्यांना आवाहन

जालना । प्रतिनिधी

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना आरक्षित प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. या पार्श्वभूमीवर इयत्ता बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्र अर्जांची पडताळणी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत सुरू आहे.

या प्रक्रियेत ज्या विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्राचे अर्ज त्रुटीपूर्ततेसाठी प्रलंबित आहेत, अशा विद्यार्थ्यांना संबंधित समितीमार्फत एसएमएस व ई-मेलद्वारे कळविण्यात आले आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप संबंधित समितीशी संपर्क साधून अर्जातील त्रुटींची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या अर्जाची स्थिती तपासून आवश्यक कागदपत्रे व माहिती ऑनलाइन पद्धतीने सादर करावी. अर्जातील त्रुटी दूर करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहणार आहे.

जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशापासून वंचित राहू नयेत, यासाठी विद्यार्थ्यांनी तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने केले आहे. अर्जासंदर्भात मदत किंवा मार्गदर्शनासाठी बार्टी मुख्यालय, पुणे येथील मदत कक्षाच्या ०२०-२६३३३३३९ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ९४०४९९९४५२ या व्हॉट्सप क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच helpdeskbarti.in या ई-मेलवरही संपर्क साधता येईल. असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जालना यांच्या उपाध्यक्ष तथा सदस्य संगीता मकरंद यांनी केले आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



लातूर जिल्हा बँकेवर पुन्हा देशमुखांचेच कायम वर्चस्व

चेअरमनपदी धिरज देशमुख, तर व्हाइस चेअरमन म्हणून अविनाश जाधव यांची बिनविरोध निवड; नूतन चेअरमन व्हाइस चेअरमन निवडीनंतर परिसरात फटाक्यांची आतषबाजी

लातूर । संतोष सोनवणे

लातूर जिल्ह्याच्या सहकार आणि राजकारणाचे सत्ताकेंद्र मानल्या जाणाऱ्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांची २५ नोव्हेंबर रोजी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली असून बँकेच्या उपाध्यक्षपदी अविनाश बाळासाहेब जाधव यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली असून या निवडीमुळे लातूरच्या सहकार क्षेत्रात माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील माजी मंत्री आमदार अमितजी देशमुख, बँकेचे विद्यमान चेअरमन धीरज विलासराव देशमुख यांचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

याबाबत आज बुधवारी सकाळी ११ वाजता बँकेच्या संचालक मंडळ सभागृहात बँकेचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी जिल्हाधिकारी श्री नेटके व सहाय्यक निवडणूक अधिकारी जिल्हा उपनिबंधक पोतलंगे यांच्याकडे चेअरमन पदासाठी धीरज विलासराव देशमुख व व्हाइस चेअरमन पदासाठी अविनाश बाळासाहेब जाधव यांनी नामनिर्देशन फॉर्म दाखल केले. दोन्ही पदांसाठी एकेक अर्ज दाखल झाल्याने ही निवड बिनविरोध करण्यात आली निवड झाल्यावर सर्व संचालक मंडळाच्या बैठकीत नूतन चेअरमन धीरज देशमुख व व्हाइस चेअरमन अविनाश जाधव यांच्या निवडीचे सर्व संचालक मंडळानी अभिनंदन केले.

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी नूतन जिल्हा बँकेचे चेअरमन व व्हाइस चेअरमन बँकेत केला सत्कार

बुधवारी जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासराव देशमुख व्हाइस चेअरमन अविनाश बाळासाहेब जाधव यांची निवड होताच सहकार महर्षी दिलीपराव देशमुख सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडून नवनिर्वाचित चेअरमन धीरज विलासराव देशमुख व व्हाइस चेअरमन अविनाश बाळासाहेब जाधव यांच्या निवडीबद्दल बँकेच्या मुख्यालयात शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला पुढीक कार्यास शुभेच्छा दिल्या.

सहकार पॅनलला स्पष्ट बहुमत मिळाल्याने बँकेच्या परंपरेनुसार बिनविरोध निवडी





नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत धिरज देशमुख यांच्या नेतृत्वाखालील 'सहकार पॅनल'ने विरोधकांच्या 'परिवर्तन पॅनल'चा पराभव करत बहुमत मिळवले होते. आज अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडीसाठी पार पडलेल्या विशेष सभेत इतर कोणाचाही अर्ज न आल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी धिरज देशमुख आणि अविनाश जाधव यांची बिनविरोध निवड झाल्याचे अधिकृतपणे जाहीर केले. निवड जाहीर होताच बँक परिसरात आणि संपूर्ण जिल्ह्यात सहकार पॅनलच्या कार्यकर्त्यांनी व समर्थकांनी फटाके फोडून आणि गुलालाची उधळण करत मोठा जल्लोष केला.

दुसऱ्यांना धीरज देशमुख यांना चेअरमनपदाची संधी

यापूर्वी डिसेंबर २०२१ मध्ये धिरज देशमुख यांची या बँकेच्या अध्यक्षपदी प्रथमच बिनविरोध निवड झाली होती. त्यावेळी महाराष्ट्रातील सर्वात तरुण जिल्हा बँक अध्यक्ष म्हणून त्यांनी पदभार स्वीकारत आपली छाप पाडली होती. गेल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी बँकेचा कारभार पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख ठेवण्यावर भर दिला त्यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हा बँकेने ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत आधुनिक बँकिंग सेवा पोहोचवण्यात मोठे यश मिळवले आहे. विशेषत: शेतक-यांना पीक विमा परताव्याचे वेळेत वितरण करणे, ज्येष्ठ नागरिक व लाभार्थ्यांचे निवृत्तीवेतन थेट खात्यात जमा करणे आणि ग्रामीण भागात २४ तास एटीएम सुविधेसोबतच 'मोबाईल एटीएम व्हॅन' अर्थात फिरती बँक शाखा सुरू करून ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी सभासद यांनी सहकार यांनी सहकार पॅनल च्या उमेदवारांना आशीर्वाद दिला आहे अशी चर्चा आज निवडीच्या वेळी जिल्ह्यातील शेतकरी सभासद यांच्यात सुरू होती.

जिल्हा बँकेच्या मुख्यालयात निवडीच्या वेळी बँकेचे चेअरमन धीरज विलासराव देशमुख, व्हाइस चेअरमन अविनाश बाळासाहेब जाधव, संचालक हेमंत जाधव, संचालक भगवानराव पाटील तळेगावकर, संचालक अरविंद पाटील, संचालक अतुल गंभीरे संचालक आशिष राजुरकर, संचालक संतोष पाटील संचालक जगन्नाथ पाटील, संचालक सर्जेराव मोरे, संचालक ऋषिकेश कराड, संचालक चंद्रशेखर दंडीमे, संचालक जयेश माने संचालक सौ प्रीती भोसले सौ शीतल पाटील, सौ गीतांजली लांडगे संचालक अँड शेषराव हाके संचालक विवेक शिरसाठ उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया पार पडण्यासाठी निवासी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी केशव नेटके व सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक पोतंगळे सहाय्यक निवडणूक अधिकारी गाडेकर यांनी परिश्रम घेतले.

बँकेच्या मुख्यालयात नूतन चेअरमन व व्हाइस चेअरमन यांच्या निवडीनंतर नागरिकांचा कौतुकाचा वर्षाव

बुधवारी जिल्हा बँकेच्या निवडी नंतर चेअरमन धीरज विलासराव देशमुख व्हाइस चेअरमन अविनाश बाळासाहेब जाधव यांची निवड होताच जिल्हाभरातून आलेल्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट पदाधिकारी कार्यकर्ते यांनी जल्लोष केला त्यांनतर पदाधिकारी कार्यकर्ते यांनी चेअरमन धीरज देशमुख व्हाइस चेअरमन अविनाश जाधव यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, माजी आमदार वैजनाथदादा शिंदे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, अँड.किरण जाधव, अँड प्रमोद जाधव, शाम भोसले, विजय देशमुख, शिवानंद हेंगणे, सूरज पाटील यांच्यासह मांजरा परिवारावरील संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंतेश्वर बंधाऱ्याचे काम अंतिम टप्प्यात : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची माहिती

अहमदपूर । प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला अंतेश्वर प्रकल्प अंतिम टप्प्यात असून लवकरच इतर प्रशासकीय बाबी पूर्ण होऊन याचे काम पूर्णत्वास जाईल असा विश्वास महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला आहे.

आज महाराष्ट्र राज्याचे जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अंतेश्वर बंधाऱ्याच्या प्रकल्पाच्या विविध कामासंदर्भात ऑनलाईन बैठक संपन्न झाली या बैठकीत सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी सहभाग नोंदवला. या बैठकीत त्यांनी इतर



प्रशासकीय बाबी पूर्ण करून हा जर प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास गेला तर दुष्काळग्रस्त भागाला मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे असे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी या बैठकीत म्हटले.

अंतेश्वर बंधाऱ्याचा हा प्रकल्प अहमदपूर आणि चाकूर मतदारसंघासाठी नवसंजीवनी ठरणार असून या मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात या ठिकाणी पाणी थांबणार आहे आणि याचा फायदा शेतकऱ्यांना सिंचन सुविधासाठी होणार आहे त्याचबरोबर शेती उत्पादनात सुद्धा मोठ्या प्रमाणात या प्रकल्पामुळे वाढ होणार असल्याची सुद्धा सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी या बैठकीत सांगितले. प्रकल्पासंदर्भात नव्याने प्रस्ताव शासनाकडे असून हा प्रकल्प कमीत कमी कालावधीमध्ये पूर्ण व्हावा अशी विनंती सुद्धा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी या बैठकीदरम्यान केली. या बैठकीस जलसंधारण खात्याचे विविध अधिकारी व लातूर जिल्ह्यातील विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा लातूर जिल्हा दौरा कार्यक्रम

लातूर । प्रतिनिधी

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे २६ व २७ नोव्हेंबर २०२६ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे २६ नोव्हेंबर रोजी रात्री लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व मुक्काम. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.१० वाजता ते लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण करतील. सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस ते उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीनुसार साताराकडे प्रयाण करतील.

बुधोडा येथे विविध उपक्रमाने संविधान दिन साजरा

औसा । बी.डी. उबाळे

दि २६ नोव्हेंबर २०२६ रोजी जि. प. प्रा. शा.बुधोडा येथे भारतीय संविधान दिन विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. सर्वप्रथम गावामध्ये प्रभात फेरी काढण्यात आली. त्यानंतर गावातील भव्यदिव्य अशा, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे सर्व ग्रामस्थ आणि शिक्षक वृंद व विद्यार्थी समवेत प्रतिमेचे पूजन करण्यात आले, संविधानाचे सामूहिक वाचन व त्यानंतर शालेय प्रांगणामध्ये पुन्हा संविधान प्रतिमेचे व संविधानाची प्रत यांचे पूजन आणि माजी एस एम सी अध्यक्ष सुनील कांबळे, शाळेचे मुख्याध्यापक बिरादार यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

आपल्या देशाची आन, बान आणि शान असणारे भारतीय संविधान या विषयी मनोगत श्रीमती भारत कांबळे मॅडमनी मनोगत व्यक्त करताना भारतीय संविधान निर्मितीसाठी खूप



कष्ट घ्यावे लागले कारण तत्कालीन व्यवस्था आहे. अत्यंत प्रतिकूल होती त्या प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल करण्याकरिता महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतःची तब्येत व्यवस्थित नसतानाही केवळ मानवाना आणि महिला यांना मानवता पूर्ण न्याय देण्याचा आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता ही देशात प्रचलित रूढी कायम होण्याकरिता त्यांनी २ वर्षे ११ महिने १८ दिवस रात्र शारीरिक, मानसिक परिश्रम घेऊन ही घटना निर्माण केली. ज्यामुळे आज सर्व भारतीय एक संघ नांदतात. यावेळी विद्यार्थ्यांची समय सूचक अशी भाषणे झाली. सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धा तसेच रंगभरण स्पर्धा संविधान चित्रकला स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा नाटिका, रंगभरण स्पर्धा... अशा विविध कार्यक्रमाने आजचा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यासाठी शाळेतले सर्व शिक्षकवंद व विद्यार्थी यांनी सहकार्य केले. या सर्व कार्यक्रमाचे निरीक्षण शिक्षण विस्तार अधिकारी, बीट सेलूचे शेख करीम यांनी करून मुलांचे कौतुक केले व सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने शिक्षण प्रेमी ग्रामस्थ, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

राजीव गांधी पॉलिटेक्निक व लातूर कॉलेज ऑफ आयटीआयमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा

संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करून लोकशाही मूल्यांचे जतन करण्याचा संकल्प

लातूर । प्रतिनिधी

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेच्या राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक, लातूर व लातूर कॉलेज ऑफ आयटीआय, हासेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक,



कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे (प्रस्तावनेचे) सामूहिक वाचन केले. भारतीय संविधान हे देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा भक्कम आधार असून, संविधानाने प्रत्येक नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूलभूत मूल्ये प्रदान केली आहेत. संविधानातील अधिकारांसोबतच नागरिकांनी आपल्या कर्तव्यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी संविधानातील मूल्यांचा अंगीकार करून जबाबदार नागरिक बनावे, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान सभेने संविधानाचा स्वीकार केला, तर २६ जानेवारी १९५० रोजी संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. या ऐतिहासिक दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी आदर, लोकशाहीची जाणीव, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, प्राचार्य योगिता मेतगे, प्राचार्य मुंडे एम जी, विभाग प्रमुख पाटील डी पी, गटनिदेशक गायकवाड एस एन, पंचाक्षरी एस एम, खोडसे आर एन, यमलवाड एस व्ही, अंबुलगे एम डी, कसबे आय डी ग्रंथपाल मनदीप सवाई व विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

उदगीर । पाटील मनेश

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात दिनविशेष समितीच्या वतीने संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्वांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले आणि संविधानाप्रती निष्ठा राखण्याची शपथ घेतली. भारतीय संविधान – एक चिंतन या विषयावर लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. डॉ. गौरव जेवळीकर यांचे व्याख्यान झाले.



यावेळी बोलताना त्यांनी भारतीय संविधानातील मूलभूत हक्क, कर्तव्ये, मार्गदर्शक तत्त्वे आणि सद्यस्थिती यावर सविस्तर विवेचन केले. संविधान हे केवळ पुस्तक नसून, प्रत्येक नागरिकाच्या जीवनाचा आधार आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये जपली तरच लोकशाही बळकट होईल, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तरुणांनी संविधान वाचावे, समजून घ्यावे आणि त्यानुसार आचरण करावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. प्रकाश तोंडारे होते. मंचावर संस्थेचे सहसचिव प्रशांत पेन्सलवार, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना अॅड. तोंडारे यांनी संविधानामुळे सर्वसामान्य नागरिकांना मिळालेल्या अधिकारांचे महत्त्व विशद केले. प्राचार्य डॉ. मस्के यांनी प्रास्ताविकात सर्वांनी संविधानाचा आदर करत जबाबदार नागरिक बनावे, असे सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनविशेष समितीचे प्रा. शिवहर फुलवळकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. मनोहर समगर यांनी केले.

लातूर फार्मसीत संविधान दिन उत्साहात साजरा



लातूर । प्रतिनिधी

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर मध्ये भारतीय संविधानाच्या मूल्याची जनजागृती व्हावी यासाठी हर घर संविधान अभियान मोहीम राबविण्यात आलेले आहे. २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय राज्यघटने बाबत जागरूकता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये तसेच देशाचे भावीनागरिक यांच्यापर्यंत पोहोचावीत यासाठी राज्यातील महाविद्यालय शैक्षणिक संकुलात जनजागृती केली आहे. तसेच महाविद्यालयात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व संविधान प्रस्ताविकेचे वाचन करून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली आहे.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, संचालिका डॉ माधुरी बावगे, उपप्राचार्या भाग्यश्री धोत्रे, प्रा भागवत सोमवंशी, प्रा अमित राजूरकर, प्रा अल्ताफ शेख, प्रा नम्रता शिवणकर, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून संविधानाचे वाचन करण्यात आले.

संविधान तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा रंगकर्मी प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम!

संविधान दिनानिमित्त पालातील नागरिकांना संविधान प्रत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

उदगीर । प्रतिनिधी

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. उदगीर नगरपालिकेसमोरील पालात राहणाऱ्या नागरिकांना भारतीय संविधानाची प्रत देऊन संविधानाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले, तर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. भारतीय संविधान हा केवळ देशाचा कायदा नसून प्रत्येक नागरिकाला समानतेचा, स्वातंत्र्याचा, न्यायाचा आणि बंधुतेचा अधिकार



देणारा लोकशाहीचा भक्कम आधार आहे. संविधानातील मूल्ये समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजेत, या उद्देशाने रंगकर्मी प्रतिष्ठानने हा उपक्रम आयोजित केला होता.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांपर्यंत शिक्षणाची संधी आणि संविधानाचे विचार पोहोचविणे ही काळाची गरज आहे. पालात राहणाऱ्या नागरिकांनाही संविधानाची माहिती व्हावी, त्यांना आपल्या घटनात्मक अधिकारांची जाणीव व्हावी, तसेच त्यांच्या मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, या हेतूने संविधानाच्या प्रतींचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे.

आजही समाजातील मुले प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत आहेत. अशा मुलांच्या हातात शैक्षणिक साहित्य देणे म्हणजे त्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. केवळ संविधान दिन साजरा न करता संविधानातील समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये प्रत्यक्ष उतरविण्यासाठी रंगकर्मी प्रतिष्ठानच्या वतीने उपक्रम राबविला. यावेळी रंगकर्मी प्रतिष्ठानच्या वतीने मागील दहा वर्षापासून सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक उपक्रम राबविले जातात यावेळी रंगकर्मी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड, सचिव प्रा. ज्योती मद्देवाड, मारोती लांडगे, उपाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, रसूल दा पठाण, सचिन शिवशेट्टे, जहांगीर पटेल, मनोहर लोहारे, हणमंत केंद्रे, बसवेश्वर डावळे, श्रीधर सावळे, शिवाजी शिंदे, बाबासाहेब मादळे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

मकसूद पटेल
जिल्हा प्रतिनिधी ९७६७७८५८५५

शेख मौला शेख उस्मान
उपसंपादक ९७६६६६४९४९

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

लाट खुर्द ते उस्माननगर रस्त्याकडे आमदार साहेब लक्ष देतील का? : संतोष पाटील गवारे

उस्माननगर । प्रतिनिधी



लाट खुर्द ते उस्माननगर या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून या रस्त्याकडे आमदार साहेब लक्ष देतील का, असा सवाल आता ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे. हा रस्ता लाट खुर्द, उस्माननगरसह परिसरातील अनेक गावांसाठी मुख्य दळणवळणाचा मार्ग आहे. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून पावसामुळे चिखल आणि पाणी साचत आहे. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

शेतातील, सोयाबीन व हाळद, तसेच इतर शेतमाल वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रॉली जाणेही अवघड झाले आहे. अनेकदा वाहने चिखलात अडकत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. रुग्णांना वेळेत दवाखान्यात पोहोचणेही कठीण होत आहे. याबाबत ग्रामस्थांनी अनेकवेळा मागणी करूनही रस्त्याची दुरुस्ती झालेली नाही, अशी भावना परीसरातील नागरिक करीत आहेत. त्यामुळे आता तरी लोकप्रतिनिधींनी या रस्त्याची पाहणी करून तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

याबाबत बोलताना संतोष पाटील गवारे, म्हणाले, लाट खुर्द ते उस्माननगर हा रस्ता आमच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. शेतकरी, विद्यार्थी रोज या रस्त्याने जातात. आमदार साहेबांनी या रस्त्याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर रस्ता चांगला करून द्यावा, हीच आमची अपेक्षा आहे. रस्त्याचे काम लवकर सुरू होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

रात्रीचा सिंगल फेज वीजपुरवठा बंद; शेतकऱ्यांच्या अडचणींत वाढ!

रात्रीच्या वीजसेवेअभावी ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय; महावितरणने वीजपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी

मुदखेड । अतीक अहमद

मुदखेड तालुक्यात रात्रीचा सिंगल फेज वीजपुरवठा बंद करण्यात आल्याच्या तक्रारींमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. यापूर्वी सायंकाळी ६ ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपलब्ध असलेला वीजपुरवठा बंद झाल्याने रात्रीच्या वेळी शेतीविषयक कामांसह घरगुती वापरावरही परिणाम होत असल्याची नाराजी नागरिकांकडून व्यक्त होत आहे. रात्री वीज वापरासाठी स्वतंत्र मीटर घ्यावे, अशी भूमिका महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून मांडली जात असल्याची तक्रार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता असून, या निर्णयामागील नेमके कारण काय, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या या प्रश्नावर लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन महावितरण प्रशासनाकडे पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. रात्रीचा सिंगल फेज वीजपुरवठा तातडीने पूर्ववत करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. अन्यथा या प्रश्नावर शेतकऱ्यांचा असंतोष तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुदखेड तालुक्यातील ग्रामीण वीजपुरवठ्याबाबत महावितरण प्रशासनाने तातडीने स्पष्टीकरण देऊन शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

उमटवाडीत 'अंदर-बाहर' जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; चौघे ताब्यात, १.७६ लाखांचा मुद्देमाल जप्त

मुदखेड । अतीक अहमद



तालुक्यातील उमटवाडी येथे सुरू असलेल्या 'अंदर-बाहर' नावाच्या जुगार अड्ड्यावर मुदखेड पोलिसांनी धडक कारवाई करत चार जणांना ताब्यात घेतले. दिनांक २२ नोव्हेंबर २०२६ रोजी मुदखेड पोलीस ठाण्याचे पथक गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. या कारवाईत गजानन संभाजी सोमारे (वय ४६, रा. येळी, ता. लोहा), भुजंग केशव शिंदे (वय २३, रा. रोही पिंपळगाव, ता. मुदखेड), संभाजी गंगाधर जाधव (वय २४, रा. डोनजवळा, ह.मु. माळकोठा, ता. मुदखेड) आणि कृष्णा दिगंबर कल्याणे (वय २४, रा. मुगट, ता. मुदखेड) या चौघांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरून ६ हजार ६०० रुपये रोख रक्कम, अंदाजे १ लाख ७० हजार रुपये किमतीचे मोबाईल फोन व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ७६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २५२/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई : पोलीस अधीक्षक डॉ. नीलम रोहन यांच्या आदेशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक बेडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेडचे पोलीस निरीक्षक गणेश कराड, पोलीस उपनिरीक्षक राजेश नंद, पोलीस उपनिरीक्षक सुरेश जाधव, पोलीस उपनिरीक्षक आकाश सरोदे, पोलीस अंमलदार महेंद्रकुमार कवठेकर, कदम आणि चव्हाण यांच्या पथकाने ही कारवाई केली. अवैध जुगार, मटका तसेच इतर बेकायदेशीर प्रकारांविरुद्ध पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत असून, अशा अवैध व्यवसायांची माहिती नागरिकांनी पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड जिल्हा पोलिसांकडून करण्यात आले आहे.

मुदखेड रेल्वे स्थानकावरील तिकीट वितरण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह!

सामान्य, आरक्षित व तत्काळ तिकिटांबाबत तक्रारी; सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची नागरिकांची मागणी

मुदखेड । अतीक अहमद

दक्षिण मध्य रेल्वेच्या मुदखेड रेल्वे स्थानकावरील तिकीट वितरण व्यवस्थेबाबत प्रवाशांच्या वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सामान्य, आरक्षित व विशेषतः तत्काळ तिकिटांच्या वितरणात पारदर्शकता राखली जाते का, कर्मचाऱ्यांकडून निर्धारित वेळेचे पालन होते का, याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

यासंदर्भात विलास मैड यांच्यासह नागरिकांनी मुदखेड रेल्वे स्टेशनच्या उपअधीक्षकांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. तिकीट वितरण प्रक्रिया, कर्मचाऱ्यांची उपस्थिती, ड्युटीचे वेळापत्रक आणि प्रवाशांशी होणारी वागणूक यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच तत्काळ आरक्षणाचे नियम काटेकोरपणे पाळावेत आणि तिकीट खिडक्या निर्धारित वेळेत सुरू ठेवाव्यात, असेही निवेदनात नमूद केले आहे.



या निवेदनाची प्रत दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक व संबंधित वाणिज्य विभागाकडे पाठविण्यात आली आहे. केवळ तक्रार स्वीकारण्यापुरती कार्यवाही मर्यादित न ठेवता सखोल चौकशी करून अनियमितता आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. आता रेल्वे प्रशासन या तक्रारीची कितपत गांभीर्याने दखल घेते आणि प्रवाशांना पारदर्शक व सुरळीत सेवा देण्यासाठी कोणती ठोस पावले उचलते, याकडे मुदखेडकरांचे लक्ष लागले आहे. निवेदनावर विलास मैड, गिरीश कोत्तावार, नितीन गोडसे, रमेश बोडके, बालाजी गुडमलवार व अतीक अहमद यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

गरजू रुग्णांच्या मदतीसाठी गजानन गिरी यांची 'आरोग्यदूत' पदी नियुक्ती!

नांदेड दक्षिणचे आमदार आनंद पाटील बोंढारकर यांचा सामाजिक कार्याला नवा हातभार; गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी मदत व मार्गदर्शन मिळणार

नांदेड । प्रतिनिधी

आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळावेत, त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे तसेच आरोग्यविषयक अडचणींचे निराकरण व्हावे, या सामाजिक उद्देशाने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंद पाटील बोंढारकर यांनी गजानन बाळगीर गिरी यांची 'आरोग्यदूत' म्हणून नियुक्ती केली आहे. दि.२२ नोव्हेंबर २०२६ रोजी अधिकृत नियुक्तीपत्र देऊन ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली.

या नियुक्तीमुळे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघासह राज्यातील इतर भागांतील गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक ती मदत मिळवून देणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि आरोग्यविषयक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी सहकार्य करणे, अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी गजानन गिरी पार पाडणार आहेत. शिवसेना जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून रुग्णांच्या विविध आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी समन्वय साधणे, आवश्यक वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि अडचणीत असलेल्या रुग्णांना दिलासा देणे, हा या नियुक्तीमागील प्रमुख उद्देश आहे. आमदार आनंद पाटील बोंढारकर यांनी नियुक्तीपत्रात गजानन गिरी यांच्यावर विश्वास व्यक्त करताना, त्यांनी या जबाबदारीचे भान ठेवून गरजू रुग्णांना मदतीचा हात द्यावा, त्यांना वेळेत योग्य मार्गदर्शन व सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यांच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना दिलासा आता मिळेल आणि आरोग्यविषयक अडचणींवर मात करण्यासाठी मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.



सामाजिक कार्याची नवी जबाबदारी आरोग्यदूत म्हणून मिळालेल्या या जबाबदारीच्या माध्यमातून गजानन गिरी यांना गरजू रुग्णांच्या सेवेसाठी काम करण्याची संधी मिळणार आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना मदतीचा आधार मिळवून देण्यासाठी ही नियुक्ती महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आमदार आनंद पाटील बोंढारकर यांच्या या पुढाकाराचे सामाजिक क्षेत्रातून स्वागत होत आहे.

संविधानाचा सन्मान एका दिवसापुरता नको, तो राष्ट्रीय जीवनाचा भाग व्हावा!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते : जयभीम पाटील

भोकर । प्रतिनिधी

राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ बहुजन समाजाचे नेते नसून आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते आहेत. त्यांनी देशाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाची मूल्ये देत संविधानाच्या माध्यमातून राष्ट्राला प्रगतिपथावर नेण्याचा मार्ग दाखविला. त्यामुळे त्यांचे विचार प्रत्येक शासकीय कार्यालयात, शाळेत आणि राष्ट्रीय कार्यक्रमात प्रतिबिंबित झाले पाहिजेत. संविधानाचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो राष्ट्रीय जीवनाचा अविभाज्य भाग झाला पाहिजे, असे प्रतिपादन पत्रकार जयभीम पाटील यांनी केले. स्वातंत्र्यसेनानी डॉ. दासराव साकळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), भोकर येथे गुरुवार, दि.२६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून जयभीम पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष विजया नारायण बोलमवार व प्रमुख वक्ते जयभीम पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व भारतीय संविधानास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजया नारायण बोलमवार होत्या. प्रमुख वक्ते म्हणून पत्रकार जयभीम पाटील, तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार मनोज शिंदे यांच्यासह राऊत एच. ई., थोरात ए. पी., खांडेकर बी. के., के. डी. हनमंते, गुट्टे ए. एस., विशाल नितनवरे, लहानकर आणि शुद्धोधन गायकवाड यांची उपस्थिती होती. याप्रसंगी संस्थेतील निदेशिका, निदेशक, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. शाक्यशासन पाटील यांनी उद्देशिकेचे वाचन केले, तर महेश डोंगरे यांनी संविधानाची सामूहिक शपथ दिली. पुढे बोलताना जयभीम पाटील म्हणाले की, बाबासाहेबांना केवळ एका विशिष्ट दिवसापुरते मर्यादित ठेवून चालणार नाही. त्यांच्या विचारांचा राष्ट्रीय स्तरावर विस्तार होण्यासाठी संविधानातील मूल्ये प्रत्यक्ष आचरणात आणणे आवश्यक आहे. समाजातील जातिभेद नष्ट होणे, प्रत्येकाला समान संधी मिळणे आणि संविधानाने दिलेल्या अधिकारांचे संरक्षण होणे हीच बाबासाहेबांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय समारोपात विजया बोलमवार यांनी विद्यार्थ्यांना संविधानातील मूलभूत हक्क आणि कर्तव्यांची जाणीव करून दिली. तांत्रिक शिक्षण घेत असतानाच जबाबदार नागरिक म्हणून संविधानातील मूल्यांचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. संविधान दिनाचे औचित्य साधून संस्थेतील प्रशिक्षणार्थी वैष्णवी राठोड, विद्या लंगडे, ममता हनुवते, श्रद्धा कराळे, सानवी डोंगरे आदी विद्यार्थिनींनी संविधानातील विविध कलमांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच संविधानातील विविध कलमांची माहिती देणाऱ्या चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाला प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पकार डोंगरे यांनी केले, तर आदित्य चव्हाण यांनी आभार मानले. संस्थेतील अधिकारी, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थ्यांच्या सहभागाने कार्यक्रम उत्साहात पार पडला.

नगराध्यक्षा व पालिका प्रशासनाच्या तत्परतेने मुस्लिम स्मशानभूमी मार्ग झाला प्रकाशमान

एका दिवसात बंद पथदिवे सुरू, ईदगाह समितीकडून आभार

कुंडलवाडी । प्रतिनिधी

शहरातील मुस्लिम स्मशानभूमी मार्गावर गेल्या अनेक दिवसांपासून पथदिवे बंद होते. खांबांवरील बल्बही गायब झाल्याने संपूर्ण मार्गावर अंधाराचे साम्राज्य पसरले होते. त्यामुळे रात्री-अपरात्री दफनविधीसाठी येणाऱ्या मुस्लिम समाज बांधवांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या संदर्भात समाज बांधवांनी ईदगाह समितीचे उपाध्यक्ष मोहम्मद अफजल यांच्याकडे तक्रार केली. अफजल यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार यांना स्मशानभूमी मार्गावरील पथदिवे बंद असल्याची माहिती दिली.



माहिती मिळताच कोटलावार यांनी नगर परिषदेतील संबंधित विभाग प्रमुखाला त्या मार्गावरील पथदिवे बंद राहता कामा नये, लवकरात लवकर चालू करण्यात यावेत, असे आदेश दिले. आदेशानंतर अवघ्या एका दिवसातच स्मशानभूमी व त्या मार्गावरील सर्व पथदिवे चालू करून संपूर्ण मार्ग प्रकाशमान करण्यात आला. नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार व नगर परिषदेचे संबंधित कर्मचारी शंकर जायेवार यांच्या तत्परतेबद्दल ईदगाह समिती व मुस्लिम समाज बांधवातर्फे आभार मान्यात आले.

अर्धापूर येथे भाजप कार्यालयात संविधान गौरव दिन साजरा, शहीदांना श्रद्धांजली

अर्धापूर । संजय पंडित



भारतीय जनता पार्टी अर्धापूर शहर व ग्रामीण कार्यालयामध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाला समर्पित केलेल्या संविधानाचा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून संविधानात दिलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांचे जतन करण्याचा संकल्प करण्यात आला. याप्रसंगी मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना तसेच पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून शहीदांना मानवंदना दिली. संविधानामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही देशाला दिशा देणारे आहेत, अशी भावना यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास नगराध्यक्ष प्र. प्रवीण देशमुख, भाजपा तालुकाध्यक्ष बालाजी पाटील गव्हाणे, शहराध्यक्ष योगेश हाळदे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेट्टे, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष रामराव भालेराव, तालुकाध्यक्ष शंकरराव ढगे, युवा मोर्चा शहराध्यक्ष तुकाराम माटे, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, नगरसेवक सोनाजीराव सरोदे, व्यंकटी राऊत, बाबुराव लंगडे, नामदेवराव सरोदे, माजी जिल्हाध्यक्ष विलास साबळे, नवनाथ बारसे, सोशल मीडिया अध्यक्ष गुरुराज रणखांब, शहराध्यक्ष मनोज सरोदे, बबनराव लोखंडे, माजी सरपंच चंद्रमुनी लोणे, जेष्ठ पत्रकार उध्दवराव सरोदे, गंगाधर सोनटक्के, ड गौरव सरोदे, अमोल ठेंगे, आनंद मोरे, राजाराम पवार, ज्ञानेश्वर माटे, बाळासाहेब माटे, देवराव कांबळे, शुभम लुटे, गणेश कानोडे, आकाश सुर्यवंशी, केशव साबळे, गुलाबराव पंडीत, बाबुराव सरोदे, लक्ष्मण डोंगरे, केशव कोल्हे, पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जि.प. प्राथमिक शाळा कसबे धावंडा येथे संविधान दिन उत्साहात साजरा

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील कसबे धावंडा येथे भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या भारतीय संविधानाच्या स्वीकार दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कसबे धावंडा येथे गुरुवार, दि.२६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या गावातून काढण्यात आलेल्या प्रभातफेरीने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व विशद करणाऱ्या घोषणा देत गावामध्ये जनजागृती केली. त्यानंतर शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले तसेच संविधानातील मूल्यांचे जतन करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली.



या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये, मूलभूत अधिकार, कर्तव्ये, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या विषयांवर उत्स्फूर्त भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या भाषणातून संविधानाविषयीची जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी दिसून आली. यावेळी उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचा इतिहास, संविधान निर्मितीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान तसेच प्रत्येक नागरिकाची संविधानाप्रती असलेली जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. संविधान हा केवळ कायद्याचा दस्तऐवज नसून प्रत्येक भारतीय नागरिकाला समानतेने, सन्मानाने आणि बंधुभावाने जगण्याची दिशा देणारा जीवनमूल्यांचा आधार आहे, असे प्रतिपादन करण्यात आले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य तसेच शिक्षणप्रेमी बालाजी जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. वैद्यकीय अधिकारी डॉ. कदवार उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक करून संवैधानिक मूल्ये समाजात रुजविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक पाटील सर, मोरे सर, कदम सर आणि लोंढे सर यांची उपस्थिती होती.

नांदेडमध्ये प्रथमच RFID तंत्रज्ञानाद्वारे पोलीस भरतीची प्रात्यक्षिक शारीरिक चाचणी उत्साहात संपन्न

कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ; तोटेवाड फिजिकल अकॅडमीचा अभिनव उपक्रम, पुरुष व महिला उमेदवारांचा उत्स्फूर्त सहभाग

नांदेड । प्रतिनिधी

पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवक-युवतींना प्रत्यक्ष भरती प्रक्रियेचा अनुभव मिळावा तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शारीरिक चाचणीचे स्वरूप समजावे, या उद्देशाने कै. शिवराम बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित तोटेवाड फिजिकल अकॅडमी, नांदेड यांच्या वतीने जिल्ह्यात प्रथमच RFID तंत्रज्ञानाचा वापर करून पोलीस भरतीची प्रात्यक्षिक शारीरिक चाचणी आयोजित करण्यात आली. दि.२५ नोव्हेंबर २०२६ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर पार पडलेल्या या अभिनव उपक्रमाला पुरुष व महिला उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रात्यक्षिक शारीरिक चाचणीचा शुभारंभ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते नारळ फोडून व हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ.भास्कर माने यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून एमजीएम पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य, दैनिक लोकपत्रच्या मराठवाडा आवृत्तीचे संपादक तथा व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे अध्यक्ष डॉ. गणेश जोशी उपस्थित होते. या चाचणीमध्ये पुरुष उमेदवारांसाठी १६०० मीटर धावणे, महिला उमेदवारांसाठी ८०० मीटर धावणे, तसेच पुरुष व महिला दोन्ही गटांसाठी १०० मीटर धावणे आणि गोळाफेक अशा विविध शारीरिक चाचण्यांचा समावेश करण्यात आला होता. एकूण ५० गुणांच्या स्वरूपात या प्रात्यक्षिक चाचणीचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे उमेदवारांना प्रत्यक्ष पोलीस भरतीच्या मैदानावर कोणत्या प्रकारच्या चाचण्यांना सामोरे जावे लागते, याचा अनुभव घेता आला.



या उपक्रमाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे RFID (Radio Frequency Identification) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर. धावण्याच्या स्पर्धेदरम्यान उमेदवारांच्या वेळेची अचूक नोंद करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात आला. पारंपरिक पद्धतीऐवजी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शारीरिक चाचणीची प्रक्रिया कशा प्रकारे पार पडते, याची प्रत्यक्ष माहिती उमेदवारांना मिळाली. त्यामुळे वेळेची अचूकता, पारदर्शकता आणि आधुनिक चाचणी पद्धतींचा अनुभव घेण्याची संधी त्यांना उपलब्ध झाली. पोलीस भरतीमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ नियमित सराव पुरेसा नसून प्रत्यक्ष चाचणीचे स्वरूप समजून घेणे, वेळेचे नियोजन करणे, स्वतःच्या शारीरिक क्षमतेचे मूल्यमापन करणे आणि मानसिकदृष्ट्या तयार राहणेही तितकेच महत्त्वाचे असते. याच बाबी लक्षात घेऊन तोटेवाड फिजिकल अकॅडमीने हा अभिनव उपक्रम राबविला. अशा प्रात्यक्षिक चाचण्यांमुळे उमेदवारांमधील आत्मविश्वास वाढण्यासोबतच आगामी पोलीस भरतीसाठी अधिक नियोजनबद्ध पद्धतीने तयारी करण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाचे आयोजन तोटेवाड फिजिकल अकॅडमीचे संचालक एस.एस.तोटेवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. ग्रामीण आणि शहरी भागातील पोलीस भरती इच्छुक युवक-युवतींना एकाच व्यासपीठावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शारीरिक चाचणीचा अनुभव उपलब्ध करून देण्याचा अकॅडमीचा प्रयत्न विशेष कौतुकास्पद ठरला.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी नांदेड जिल्ह्यातील विविध फिजिकल अकॅडमीचे प्रशिक्षक तसेच लेखी परीक्षेची तयारी करून घेणाऱ्या अकॅडमींच्या संचालकांनी विशेष परिश्रम घेतले. पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांना प्रत्यक्ष चाचणीचा अनुभव देणारा आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणारा हा उपक्रम उमेदवारांसाठी प्रेरणादायी ठरला असून उपस्थित मान्यवरांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

ज्ञानसागर इंग्लिश स्कूलमध्ये तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि सर्जनशीलतेला चालना देणारे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन बुधवार, दि.२६ नोव्हेंबर रोजी आखाडा बाळापूर येथील ज्ञानसागर इंग्लिश स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रदर्शनात तालुक्यातील विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रदर्शनामध्ये उच्च प्राथमिक गटातील ७० शाळा व माध्यमिक गटातील २५ शाळा, अशा एकूण ९५ शाळांनी सहभाग घेत विविध नाविन्यपूर्ण वैज्ञानिक उपकरणे, प्रतिकृती व प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वैज्ञानिक प्रयोगांचे व प्रकल्पांचे उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी कौतुक केले.



या कार्यक्रमास पंचायत समिती कळमनुरीचे गटशिक्षणाधिकारी सुरेश सोनुने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाची कास धरून समाजातील विविध समस्यांवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाय शोधण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे म्हणून शेवाळा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी गोरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या जिज्ञासा, कल्पकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष बालाजी हेंद्रे सर, मुख्याध्यापक काजळे सर, ज्ञानसागर संस्थेचे सर्व कर्मचारी, कळमनुरी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, २६ नोव्हेंबर हा संविधान दिन असल्याने कार्यक्रमस्थळी भारतीय संविधान दिनही साजरा करण्यात आला. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. सकाळपासूनच विज्ञान प्रदर्शनाच्या ठिकाणी विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थितांची मोठी लगबग पाहायला मिळाली. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक कल्पकतेला व्यासपीठ मिळाल्याने प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, दैगलूर नाका, इतवारा, नांदेड

‘पोकरा’ तील भ्रष्टाचार प्रकरणी कारवाईसाठी जालन्यात उपोषण

जालना/प्रतिनिधी

नानाजी देशमुख कृषि संजीवनी (पोकरा) योजनेच्या अंमलबजावणीत जालना जिल्ह्यात झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी दोषी आढळलेल्या सर्व संबंधित अधिकारी आणि व्यावसायिकांवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी नळविहीरा (ता. जाड्ग्राबाद) येथील तक्रारकर्ते सुनील गायकवाड आणि अशोक कोरले यांनी आजपासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

या संदर्भात दिलेल्या सविस्तर निवेदनात त्यांनी पोकरा योजनेच्या अंमलबजावणीमध्ये २०२३ पुर्वी झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या गैरव्यवहारांसंदर्भात केलेल्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी,



नानाजी देशमुख कृषी संजीवनी

पोकरा योजनेत जालना जिल्ह्यात झालेल्या कोट्यावधींच्या घोटाळा प्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी नळविहिरा ता. जाफराबाद येथील सुनील गायकवाड आणि अशोक कोरले यांनी आजपासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

चौकशी अहवाल आणि संबंधितांकडून ३ कोटींवर रुपयांच्या वसुलीचे प्रस्ताव, संबंधित अधिकारी श्रीमती शीतल चव्हाण यांच्या निलंबनाचे आदेश, कृषि आयुक्त रविंद्र बिनवडे यांनी दिलेला ब्लैजदारी गुन्हा दाखल करण्याचा आदेश, विभागीय चौकशीचे आदेश, योजनेतील गैरव्यवहार आणि त्याविषयी सादर करण्यात आलेला सविस्तर चौकशी अहवाल, आणि गेल्या तीन साडेतीन वर्षांच्या सततच्या पाठपुराव्यानंतरही संबंधितांवर कोण-तीच ठोस कारवाई झाली नसल्याच्या पार्श्वभूमीवर आजपासून पुन्हा सुरु करण्यात आलेले उपोषण आंदोलन असा संदर्भही देण्यात आला आहे. विशेष म्हणजे पोकरा नामक कृषि खात्याच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेत (पान २ वर)

भाजीपाला व फळ विक्रेत्यांकडून होणारी २० रुपयांची दैनंदिन वसुली तात्काळ बंद करा

शिवसेनेची बाजार समितीकडे मागणी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी शहरातील किरकोळ भाजीपाला व फळ विक्रेत्यांकडून कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत दररोज आकारण्यात येणारी प्रत्येकी २० रुपयांची वसुली तात्काळ बंद करण्यात यावी, अशी आग्रही मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शिवसेनेचे शहरप्रमुख वैजनाथ माने व प्रतीक मुंडे यांनी बाजार समितीच्या सभापतींकडे लेखी निवेदन सादर केले.

सध्या दुष्काळसदृश परिस्थिती आणि वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांसह छोट्या व्यावसायिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. हातावर पोट असणाऱ्या किरकोळ भाजीपाला व फळ विक्रेत्यांना आणि हातगाडी व कटलारी व्यावसायिक आधीच अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत त्यांच्याकडून दररोज २० रुपये वसूल करणे



अन्यायकारक व आर्थिकदृष्ट्या जाचक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

भाजीपाला व फळ विक्रेते हे अत्यंत अल्प भांडवलावर आपला व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दिवसभर कष्ट करून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नातून पुन्हा दररोज शुल्क भरावे लागत असल्याने त्यांच्या आर्थिक अडचणीत भर पडत आहे. त्यामुळे या कष्टकरी घटकांना दिलासा देण्याची गरज असल्याचे शिव-सेनेने म्हटले आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील तरतुदींचा विचार करून तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार छोट्या विक्रेत्यांवरील हा आर्थिक भार कमी करण्यासाठी बाजार समिती प्रशासनाने सकारात्मक निर्णय (पान २ वर)

वानटाकळीत सरपंचांना मोठा धक्का! अवघ्या दोन मतांनी अविश्वास ठराव मंजूर

२५८ मते अविश्वासाच्या बाजूने; सरपंच गंगूबाई हंगे यांना पद गमवावे लागले

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वानटाकळी गावात मागील अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या सरपंचांविरोधातील अविश्वास ठरावाचा अखेर निकाल लागला असून, विद्यमान सरपंच गंगूबाई हंगे यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. अवघ्या दोन मतांच्या फरकाने अविश्वास ठराव मंजूर झाल्याने त्यांना सरपंचपद गमवावे लागले आहे. या निकालामुळे गावाच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

वानटाकळी ग्रामपंचायतीच्या आठ सदस्यांनी सरपंच गंगूबाई हंगे यांच्याविरोधात अविश्वास ठराव दाखल केला होता. या ठराव-ावर निर्णय घेण्यासाठी गुरुवार, दिनांक २६



नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया घेण्यात आली. दिवसभर सुरू असलेल्या मतदान प्रक्रियेकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले होते. सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास निकाल जाहीर होताच अवघ्या दोन मतांनी अविश्वास ठराव मंजूर झाल्याचे स्पष्ट झाले. या मतदान प्रक्रियेत एकूण २५८ मते अविश्वास (पान २ वर)



कडा : येथील माजी सभापती कै.बबनराव बाबुराव ढोबळे यांचे चिरंजीव संग्राम व चि.सौ.कां. शुभांगी बाळासाहेब गोविंदराव कर्डिले यांची कन्या यांच्या विवाह सोहळ्याप्रंसगी नवदांम्पत्यांना शुभेच्छा देतांना पत्रकार रहेमान सय्यद, बाबु तारु, समीर सय्यद, अविनाश ढोबळे, अल्ताब शेख दिसत आहेत.

माजी आ.स्व.उत्तमराव विटेकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त सोनपेठ येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, नेत्रतपासणी, चष्मे व औषधांचे वाटप

सोनपेठ/सुभाष सावंत

माजी आमदार स्व. उत्तमराव (भाऊ) विटेकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सोनपेठ शहर यांच्या वतीने सोमवार, दि. ३० नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य मोफत आरोग्य तप-ासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



या शिबिरात नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, डोळ्यांच्या नंबरची तपासणी, मोफत चष्मे वाटप तसेच नेत्ररोग तज्ज्ञांच्या मार्फत मोफत औषधांचे वाटप करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ मिळावा आणि गरजू रुग्णांना नेत्रविकारांवर उपचाराची संधी उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

हे शिबिर सोमवार, दि. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत ग्रामीण रुग्णालय, सोनपेठ येथे पार पडणार आहे. या आरोग्य शिबिराचा सोनपेठ शहरासह परिसरातील नागरिकांनी, विशेषतः गरजू रुग्णांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सोनपेठ शहर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दादासाहेब फाळके इंडियन टेलिव्हिजन अवॉर्ड २०२६ सोहळ्यास भास्करनाना शिंदे यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रण!

अभिनेत्री मंदाकिनी यांची प्रमुख उपस्थिती

माजलगाव/प्रतिनिधी

भारतीय टेलिव्हिजन क्षेत्रातील उत्कृष्टता, सर्जनशीलता आणि उल्लेखनीय कार्याचा गौरव करणाऱ्या प्रतिष्ठित ‘दादासाहेब फाळके इंडियन टेलिव्हिजन अवॉर्ड २०२६’ या भव्य पुरस्कार सोहळ्यासाठी आदरणीय श्री. भास्कर किसान शिंदे यांना विशेष अतिथी म्हणून सन्मानपूर्वक निमंत्रित करण्यात आले आहे. ही माजलगावसह परिसरासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन रविवार, दिनांक ६ डिसेंबर २०२६ रोजी मुंबई येथील आलिशान हॉटेल सहारा स्टार येथे करण्यात आले आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री मंदाकिनी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. या पुरस्कार सोहळ्यात भारतीय टेलिव्हिजन क्षेत्रातील नामवंत कलाकार, निर्माते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रतिभावंतांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असून, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मान्यवरांच्या भेटीगाठींमुळे सोहळ्याला विशेष रंगत येणार असल्याचे आयोजक अखिलेश सिंह यांनी दिलेल्या पत्रकात सांगितले आहे. भास्कर किसान शिंदे यांना विशेष अतिथी म्हणून मिळालेले हे निमंत्रण त्यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा गौरव करणारे ठरत आहे. मुंबईतील या प्रतिष्ठित व्यासपीठावर त्यांना उपस्थित राहण्याची संधी मिळणार असल्याने सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. या मुळे माजल-गावच्या शिरपेचात मानाचा तुरा ची भर पडली आहे.

टोकवाडीत आई लक्ष्मी जनार्धन मुंडे यांच्या अमृतदिनानिमित्त ‘माय महोत्सव’ संपन्न!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील टोकवाडी येथील आई लक्ष्मी जनार्धन मुंडे यांच्या अमृतदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला ‘माय महोत्सव’ विविध सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या महोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमिपूजन हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमिपूजन बीड जिल्हा परिषद गटनेते अजयजी मुंडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. संतो-षजी मुंडे (उपाध्यक्ष, दिव्यांग मंत्रालय, महाराष्ट्र राज्य),



ह भ प तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, ह भ प जगदीश महाराज सोनवणे , माननीय सभापती पिंटू मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते शंकरजी कापसे सर, माजी सरपंच मारुती मुंडे, भाजपचे तालुकाध्यक्ष संजय मुंडे सर, गणेश दशरथआबा मुंडे, युवा मंच टोकवाडीचे पदाधिकारी, डॉ. राजारामजी मुंडे, उपसरपंच प्रदीप रोडे, अमर रोडे, दिलीप भालेराव, रामेश्वर कोकाटे, (पान २ वर)

२०१६ पूर्वीपासून शासकीय जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना ‘फार्मर आयडी’ द्या!

राष्ट्रीय चर्मकार महासंघ आक्रमक; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विशेष शासन आदेशाची नानासाहेब घोडके यांची मागणी

माजलगाव/प्रतिनिधी

शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी (शेतकरी ओळख क्रमांक) अनिवार्य करण्यात येत असताना, सन २०१६ पूर्वीपासून शासकीय जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. सातबारा उतारा किंवा मालकी हक्काची कागदपत्रे नसल्यामुळे प्रत्यक्ष शेती करणारे हजारो शेतकरी फार्मर आयडीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. या गंभीर प्रश्नावर राष्ट्रीय चर्मकार महासंघाने आक्रमक भूमिका घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विशेष शासन आदेश निर्गमित



करण्याची जोरदार मागणी केली आहे.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार, माजलगाव यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांत अनेक शेतकरी मागील अनेक वर्षांपासून शासकीय जमिनी कसून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. काही शेतकरी सन २०१६ पूर्वीपासून प्रत्यक्ष शेती करत असतानाही त्यांच्याकडे सातबारा उतारा अथवा मालकी हक्काची अधिकृत कागदपत्रे नसल्याने फार्मर आयडी नोंदणीमध्ये अडथळे येत आहेत. परिणामी, पीक विमा, कृषी अनुदान, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई, बियाणे व खत अनुदान यांसह विविध शासकीय योजनांच्या लाभाप-ासून हे शेतकरी वंचित (पान २ वर)

अंबाजोगाईत २८ नोव्हेंबरला मधुमेहावरील महाशिबिर

धारूर/अतूल शिनगारे



मोफत रक्त तपासणी, आरोग्य तपासण्या व औषधोपचाराची सुविधा; नागरिकांनी लाभ घेण्याचे डॉ.अतुल शिंदे यांचे आवाहन

जागतिक मधुमेह दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाई येथे २८ नोव्हेंबर रोजी मधुमेहावरील महाशिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.३० वाजता प्रशांतनगर येथील योगेश्वरी डायबेटीस केअर सेंटर येथे हे शिबिर होणार असल्याची माहिती प्रसिद्ध मधुमेहतज्ज्ञ डॉ. अतुल शिंदे यांनी दिली.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), ॲम्मपा आणि योगेश्वरी डायबेटीस केअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी जागतिक मधुमेह दिनानिमित्त नागरिकांसाठी या उपक्रमाचे आयोजन केले जाते. यंदाही मधुमेहग्रस्त रुग्णांसह इतर नागरिकांना मोफत तपासण्या व औषधोपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या शिबिरात मधुमेह, उच्च रक्तदाब, थायरॉईड व हृदयविकाराचा त्रास असलेल्या रुग्णांसह ४० वर्षांवरील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. अतुल शिंदे यांनी केले आहे. (पान २ वर)

संविधान दिनानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक पुस्तकांचे वाटप



धारूर/अतुल शिनगारे

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडारवस्ती येथे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक पुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लागावा, या उद्देशाने श्री. राहुल वाडेकर आणि महेश शिरसट यांच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करून शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच भारतीय संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्ये आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या संविधानातील मूलभूत मूल्यांची माहिती देण्यात आली.आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे (पान २ वर)

यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



भारतीय संविधानाच्या गौरवशाली परंपरेची जाणीव करून देणारा संविधान दिन गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी परळी वैजनाथ येथील नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस तसेच भारतीय संविधानास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.अतुल दुबे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशीकेचे सामूहिक वाचन केले.

भारतीय संविधानाने देशाला लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये प्रदान केली आहेत. संविधानातील या मूलभूत मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, तसेच लोकशाहीप्रती आदर, सामाजिक बांधिलकी आणि नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांची जाणीव अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन (पान २ वर)

सनराईज इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहाचे उदघाटन

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

सनराईज इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, परळी येथे बुधवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात वार्षिक क्रीडा सप्ताहाचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. संजय देशमुख (तालुका क्रीडा समन्वयक, परळी), श्री. विलास अरगडे (अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संघटना व ज्येष्ठ क्रीडा शिक्षक, महर्षी कणाद विद्यालय, परळी), श्री. गणेश गुट्टे (अध्यक्ष, क्रीडा संघटना, परळी वै.), श्री. गोविंदराव मुंडे (अध्यक्ष, सनराईज इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज), श्री. हरिश्चंद्र चाटे (उपाध्यक्ष), सौ. प्रियतमा मुंडे (सेक्रेटरी) तसेच



माननीय श्री.साबळे सर (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, तळेगाव) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर क्रीडा सप्ताहाचे औपचारिक उद्घाटन हा खेळाचा ध्वज फडकून करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. संजय देशमुख सर, प्रमुख पाहुणे श्री. विलास अरगडे सर, श्री. गणेश गुट्टे सर आणि शाळेच्या सेक्रेटरी सौ. प्रियतमा मुंडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मनो-गतात त्यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील खेळाचे महत्त्व विशद केले. सुदृढ शरीर हीच खरी संपत्ती हा संदेश देत खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य, शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संघभावना आणि खिलाडूवृत्ती विकसित होते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडाक्षेत्रालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य श्री. प्रदीप खताळ यांनी केले. यावेळी शाळेचे क्रीडा विभागप्रमुख श्री. मनोज नागरगोजे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देत वार्षिक क्रीडा सप्ताहाच्या आयोजनामागील उद्देश आणि क्रीडा सप्ताहादरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या विविध क्रीडा उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन (पान २ वर)



जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ‘जगमित्र’ बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४० निवासी संपादक : मकरंद जहागीरदार ९४२२२१६०६१

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740) Resident Editor: Makarand Jahagirdar (Mobile No. 9422216061)

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

मंगळ बाजार परिसरात ३० खाटांचे नागरी आरोग्य केंद्र उभारण्याची मागणी!

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील मंगळ बाजार व लगतच्या परिसरातील नागरिकांना दर्जेदार आणि परवडणार्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या भागात ३० खाटांच्या क्षमतेचे नागरी सामुदायिक आरोग्य केंद्र (अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर) स्थापन करण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक दुर्गेश किशनलाल काठोठीवाले यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जालना शहर महानगरपालिकेच्या आयुक्तांना लेखी निवेदन देऊन सदर प्रस्ताव आगामी सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेत समाविष्ट करून मंजुरी देण्याची मागणी केली आहे.

मंगळ बाजार आणि परिसरातील वाढती लोकसंख्या, नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा तसेच सध्या उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांवरील वाढता ताण लक्षात घेता या ठिकाणी स्वतंत्र आरोग्य केंद्राची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि बालकांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळावेत, हा या मागणीमागील प्रमुख उद्देश आहे. प्रस्तावित ३० खाटांच्या आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), आंतररुग्ण विभाग (आयपीडी), प्राथमिक व नियमित उपचार, आपत्कालीन आरोग्यसेवा, माता-बाल आरोग्य सेवा, वैद्यकीय तपासण्या, औषधोपचार आणि प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना किरकोळ तसेच आवश्यक वैद्यकीय उपचारांसाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नाही. परिणामी नागरिकांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाचण्यास मदत होईल.

या आरोग्य केंद्रासाठी योग्य जागा निश्चित करून नवीन इमारत उभारणे अथवा महानगरपालिकेच्या उपलब्ध इमारतीचा विकास करून तिचा वापर करणे, आवश्यक वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचार्यांची नियुक्ती करणे, ३० खाटा, वैद्यकीय उपकरणे आणि औषधसाठा उपलब्ध करून देणे, तसेच वार्षिक देखभाल व व्यवस्थापनासाठी निधीची तरतूद करण्याची मागणीही करण्यात आली आहे. प्रकल्पासाठी तांत्रिक अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक काठोठीवाले यांनी केली आहे.

आळंदी एसटी स्थानकाच्या प्रलंबित प्रश्नाला अखेर गती; मुरमीकरणाच्या कामाचा शुभारंभ!

संजय घुंडरे-पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; परिवहन राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या निर्देशानंतर प्रशासकीय यंत्रणा सक्रिय

आळंदी । प्रतिनिधी

तीर्थक्षेत्र आळंदी येथील एसटी महामंडळाच्या जागेचा योग्य वापर, एसटी स्थानकाची दुरवस्था आणि कायमस्वरूपी एसटी सुविधांचा प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. एसटी महामंडळाच्या मालकीची आळंदी परिसरात मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध असतानाही या जागेचा नियोजनबद्ध वापर होत नसल्याचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला जात होता. यातील काही जागा पीएमपीएमएलच्या वापरासाठी देण्यात आली असून, उर्वरित जागेचा उपयोग करून एसटी महामंडळाच्या प्रवाशांसाठी कायमस्वरूपी व सक्षम सुविधा निर्माण व्हाव्यात, अशी मागणी होत होती.

या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी संजय घुंडरे-पाटील यांनी अथक प्रयत्न आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू केला. एसटी स्थानक परिसरात खड्डे पडून दुरवस्था झाल्यानंतर विविध माध्यमांनी या प्रश्नाला वाचा फोडली होती. त्यानंतर या समस्येची गांभीर्याने दखल घेत संजय घुंडरे-पाटील यांनी हा प्रश्न केवळ चर्चेपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष मार्गी लावण्याचा निर्धार केला. या अनुषंगाने परिवहन राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांची भेट घेऊन प्रश्न मांडण्यात आला. त्यानंतर त्यांनी एसटी महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना



आवश्यक निर्देश दिले. पुढे प्रादेशिक विभागप्रमुख अरुण सिया यांच्या उपस्थितीत एसटी महामंडळाचे अधिकारी, आळंदी नगरपालिका, नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, झचझड संचालक श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त यांच्या सहभागातून संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर सर्वांच्या सहमतीने गुरुवार, दि.२६ नोव्हेंबर २०२६ रोजी एसटी स्थानक परिसरातील मुरमीकरणाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. नगराध्यक्षश्री प्रशांतदादा कुह्राडे, यांच्या शुभहस्ते या कामाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी श्री माधव खांडेकर, माजी विरोधी पक्षनेते श्री डीडी भोसले-पाटील, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त ह.भ.प श्री चैतन्य महाराज कबीर, डढ महामंडळाचे पुणे विभागीय वाहतूक नियंत्रक श्री गोविंद जाधव, श्रीअजित वडगावकर, हभप.श्री बाळासाहेब शेवाळे, श्री दीपक काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

केवळ मुरमीकरण नव्हे, कायमस्वरूपी एसटी सुविधांची अपेक्षा!

मुरमीकरणाच्या कामाला सुरुवात होणे ही निश्चितच सकारात्मक बाब असली, तरी आळंदीसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या तीर्थक्षेत्रात येणाऱ्या लाखो वारकरी, भाविक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने एसटी स्थानकाचा प्रश्न व्यापक स्वरूपात सोडविणे आवश्यक आहे. उपलब्ध जागेचा योग्य वापर करून कायमस्वरूपी एसटी स्थानक, नियोजनबद्ध बस पार्किंग, प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन यासाठी परिवहन राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या सहकार्यातून पुढील काळात प्रयत्न करणार असल्याची माहिती संजय घुंडरे-पाटील यांनी यावेळेस दिली.

प्रश्न उपस्थित करणे, त्याचा सातत्याने पाठपुरावा करणे आणि प्रशासनाला कृती करण्यास प्रवृत्त करणे, यामध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरते. प्रत्यक्ष कामाच्या स्वरूपात गती मिळत असल्याने समाधान व्यक्त होत आहे. मात्र, अंतिम उद्दिष्ट केवळ तात्पुरती डागडुजी नसून आळंदीच्या एसटी सुविधांचा कायमस्वरूपी विकास हेच असले पाहिजे.

पिंपरी-चिंचवड महापालिका स्थायी समितीच्या बैठकीत विविध विकासकामे आणि प्रस्तावांना मंजुरी

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत शहरातील विविध भागांतील विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, स्वच्छता, अग्निशमन यंत्रणा, आरोग्य सुविधा आणि उद्यानांच्या देखभाल-दुरुस्तीशी संबंधित विविध प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

बैठकीत ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कावेरी नगर टाकी व बायपास जलक्षेत्रातील पाणी वितरण व्यवस्थेचे परिचालन, देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामास मान्यता देण्यात आली. तसेच गवळीनगर, दिघी, चऱ्होली, भोसरी, थेरगाव, चिंचेचा मळा, कासारवाडी, रावेत, किवळे, मामुर्डी आदी परिसरांतील रस्त्यांची दुरुस्ती, डांबरीकरण, स्थापत्यविषयक देखभाल-दुरुस्ती, ड्रेनेज लाईन व चेंबर्सची दुरुस्ती तसेच पावसाळी गटारांची साफसफाई करण्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली. शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक शौचालये व मुताऱ्यांची दैनंदिन साफसफाई आणि देखभाल, रस्ते व गटर्सची साफसफाई, नालेसफाई, बांधकामाचा राडारोडा उचलणे तसेच अतिक्रमण कारवाईसाठी आवश्यक मशिनरी व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. सार्वजनिक शौचालयांच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामांना मुदतवाढ देण्यासही मंजुरी देण्यात आली. याशिवाय महापालिका हद्दीतील आरोग्य कर्मचारी, त्यांची कुटुंबे, लहान मुले आणि युवा वर्ग तसेच सार्वजनिक शौचालयांच्या सर्वेक्षणासाठी ३८ सर्वेक्षणकर्त्यांच्या नियुक्तीला कार्योत्तर मान्यता देण्यात आली. त्यांचे मानधन थेट बँक खात्यात जमा करण्यासही मंजुरी देण्यात आली.

अग्निशमन विभागाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी महापालिकेच्या अग्निशमन केंद्रांवर व्हीएचएफ वॉकीटॉकी आणि पीओसी वॉकीटॉकी यंत्रणा पुरविणे तसेच वायरलेस यंत्रणेत सुधारणा करण्याच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. शहरातील विविध रस्त्यांवरील पावसाळी गटारांची साफसफाई, विद्युत दाहिनीचे परिचालन व देखभाल-दुरुस्ती तसेच मोरवाडी आयटीआय इमारतीसाठी लिफ्ट उभारण्याच्या कामांनाही मान्यता देण्यात आली.

शहरातील विविध सांस्कृतिक, धार्मिक आणि क्रीडा कार्यक्रमांच्या आयोजनासाठी तात्पुरती प्रकाश व्यवस्था, ध्वनिक्षेपण यंत्रणा, जनरेटर आणि सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये मोशी खाण परिसरातील कार्यक्रम, श्रीमान महासाधू श्री मोरया गोसावी संजीवन समाधी सोहळा, महापौर चषक, राज्यस्तरीय क्रीडा कार्यक्रम तसेच सार्वजनिक गणेशोत्सवातील व्यवस्थांचा समावेश आहे. तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने चिंचवड येथील ६ हजार चौरस मीटर आणि पुनावळे येथील ७ हजार चौरस मीटर क्षेत्रफळाच्या ऑक्सिजन पार्क उद्यानांची केअरटेकरसह देखभाल करण्याचे काम १८ महिन्यांच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या विविध कार्यक्रमांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी फ्लेक्स आणि बॅनर्सची छपाई व पुरवठा करण्याच्या कामास मुदतवाढ देण्याचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला. तसेच वायसीएम रुग्णालयातील रक्तपेढी विभागातील ब्लास्ट फ्रीझर उपकरणाच्या आठ वर्षांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी वार्षिक देखभाल करारास (सीएमसी) मान्यता देण्यात आली. स्थायी समितीच्या या बैठकीत शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्यसेवा, अग्निशमन व्यवस्था आणि नागरी सुविधांशी संबंधित विविध कामांना मंजुरी देण्यात आली. या निर्णयांमुळे शहरातील विविध विकासकामे आणि नागरी सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेशकाका वडगावकर यांच्या अध्यक्षपदाला ५० वर्षे पूर्ण

श्री ज्ञानेश्वर विद्यालयात गणित-विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

आळंदी देवाची । प्रतिनिधी

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेशकाका वडगावकर यांच्या अध्यक्षपदाला ५० वर्षे पूर्ण झाल्यामुळे शालेय गणित विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, गणिती कौशल्य, संशोधनवृत्ती व सर्जनशीलता विकसित करण्याच्या उद्देशाने श्री ज्ञानेश्वर विद्यालय व क. महाविद्यालय, आळंदी देवाची येथे गणित-विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले.त्या वेळी संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे वाचन करून संविधानाचे महत्त्व सांगितले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी गणित व विज्ञान विषयांवर आधारित विविध प्रतिकृती, प्रयोग, शैक्षणिक मॉडेल्स आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. शालेय गणित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश काका वडगावकर व खजिनदार डॉ. दिपक पाटील साहेब यांच्या शुभ उपस्थितीत पार पडले.

याप्रसंगी आपल्या शाळेतून गणित तज्ञ



व वैज्ञानिक घडावेत अशा अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या. विद्यालयाचे प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप काळे पर्यवेक्षिका अनिता पडळकर, अनुजायीनी राजहंस, हेमांगी उपरे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांची माहिती उपस्थितांना समजावून सांगत त्यामागील वैज्ञानिक संकल्पना व गणिती सूत्रांचे महत्त्व स्पष्ट केले. प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, जिज्ञासेला आणि प्रयोगशील वृत्तीला व्यासपीठ मिळाले. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाल्याने प्रदर्शन ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरले.'ज्ञानाचा शोध कधीच संपत नाही, आजचे कुतूहल उद्याचे संशोधन होते.'

विद्यालयाच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रकल्प तयार करण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. प्रदर्शन पाच वर्गांत भरवण्यात आले, प्रत्येक कक्षाला शास्त्रज्ञांचे नाव देऊन केलेल संशोधन व जीवनपट उलगडला. प्रदर्शनाला विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रदर्शनानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धा, प्रसनमंजुषा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. विज्ञानचे ६५ व गणिताचे ६१ प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि प्रथम तीन क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस दिले जाणार आहे. विज्ञान समिती प्रमुख संजय उदमले व गणित समिती प्रमुख शशिकला वाघमारे व सर्व गणित विज्ञान शिक्षक यांच्या मार्गदर्शनातून गणित विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले. प्रदर्शनाचे नियोजन कल्पना घोलप व उज्वला कडलासकर, सूत्रसंचलन मनीषा पवार व आभार प्रदर्शन वाघमारे शशिकला यांनी केले.

देहू येथे विचारांचा दीप प्रज्वलित करणारी तीन दिवसीय 'सृजनदीप व्याख्यानमाला' २७ नोव्हेंबरपासून

पिंपरी । प्रतिनिधी

सृजन फाउंडेशन संचलित अभंग इंग्लिश मिडीयम स्कूल, श्रीक्षेत्र देहू यांच्या वतीने शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर ते दि. २९ नोव्हेंबर २०२७ या कालावधीत तीन दिवसीय 'सृजनदीप व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. विचारांची देवाणघेवाण, समाजप्रबोधन आणि शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यांची जोपासना हा या व्याख्यानमालेचा मुख्य उद्देश आहे. सलग तीन दिवस चालणाऱ्या या व्याख्यानमालेत नामवंत वक्ते, साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

व्याख्यानमालेचा प्रारंभ शुक्रवार, २७ नोव्हेंबर रोजी 'सुजाण पालकत्व' या विषयावरील व्याख्यानाने होणार आहे. दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक, लेखक व वक्ते श्री. यजुर्वेंद्र महाजन हे विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अहिल्यानगर येथील स्नेहालय संस्थेचे विश्वस्त श्री. किरटी मोरे भूषविणार आहेत. यावेळी देहू नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्री. चेतन कोंडे, पिंपरी-चिंचवड शिक्षण मंडळाचे माजी सभापती प्राचार्य श्री. नाना शिवले आणि वाचनवेड संस्था, पुणेचे श्री. मयूर सेठ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

शनिवार, २८ नोव्हेंबर रोजी 'आपण मुले घडवूया' या विषयातून अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी हे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्योतिषाचार्य व लेखक श्री. दत्तात्रय अत्रे असतील. संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष श्री. जालिंदर महाराज मोरे, वृक्षदाई प्रतिष्ठानचे संस्थापक श्री. शिवाजी महाराज मोरे आणि उद्योजक श्री. शशिकांत काटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

रविवार, २९ नोव्हेंबर रोजी व्याख्यानमालेचा समारोप 'मी सावित्रीबाई फुले बोलतेय...' या एकपात्री नाट्यप्रयोगाने होणार आहे. सामाजिक चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या मा. देवयानी फुले या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा नाट्यप्रयोग सादर करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. स्मिताताई चव्हाण असतील. समाजसेविका डॉ. शिल्पाताई मापुस्कर, संत तुकाराम विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. विद्या कांबळे आणि देहूच्या माजी नगराध्यक्षा सौ. पुजाताई दिवटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या सर्व कार्यक्रमांचे आयोजन अभंग इंग्लिश मिडीयम स्कूल, श्रीक्षेत्र देहू येथे दररोज सायंकाळी ५.३० वाजता करण्यात आले आहे. 'सृजनदीप व्याख्यानमाला'च्या माध्यमातून समाजातील विविध ज्वलंत विषयांवर वैचारिक मंथन घडवून आणण्याचा आणि समाजाला सकारात्मक विचारांची दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या व्याख्यानमालेस देहू व परिसरातील नागरिक, पालक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी आणि विचारप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सृजन फाउंडेशनचे सचिव प्रा. विकास कंद, तसेच शाळेच्या प्राचार्या डॉ. कविता अय्यर यांनी केले आहे.

माणुसकीचा हात, सामाजिक बांधिलकीची साथ; महापौर रवि लांडगे यांच्याकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस पाच लाखांची मदत!

मोशी दुर्घटनाग्रस्तांनंतर पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकीचे दर्शन; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धनादेश सुपूर्त

पिंपरी । प्रतिनिधी

समाजातील दुःख आणि वेदनांची जाणीव ठेवून संकटाच्या काळात मदतीसाठी पुढे येणे, हीच माणुसकीची खरी ओळख आहे. याच सामाजिक भावनेतून पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांनी आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस पाच लाख रुपयांचा धनादेश सुपूर्त केला. यावेळी उद्योजक शिवराज काटे उपस्थित होते. राज्यातील संकटग्रस्त नागरिकांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या मदतकार्याला हातभार लावण्याच्या उद्देशाने महापौर लांडगे यांनी ही मदत केली.

यापूर्वीही मोशी येथील दुर्दैवी दुर्घटनेनंतर महापौर लांडगे यांनी स्वतःचा वाढदिवस साजरा करण्याचे टाळून दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना मदतीचा



हात दिला होता. स्वतःच्या आनंदापेक्षा इतरांच्या दुःखाची जाणीव ठेवत त्यांनी जपलेली सामाजिक बांधिलकी आजच्या कृतीतूनही अधोरेखित झाली आहे. सार्वजनिक जीवनात वावरताना विकासकामांबरोबरच सामाजिक भान जपणे, गरजूंच्या वेदना समजून घेणे आणि संकटाच्या प्रसंगी त्यांच्या पाठीशी उभे राहणे तितकेच आवश्यक आहे. संकटग्रस्तांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी पुढे आलेला प्रत्येक हात मोलाचा असतो. अशा कृती समाजात माणुसकीचा, सेवाभावाचा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श निर्माण करतात.

VBG-RAM-G योजनेतील ऑनलाइन हजेरी बंद करा : भूषण मुराळे

ऑनलाइन हजेरीच्या अडचणींमुळे शेतकरी व शेतमजूर त्रस्त; ऑफलाइन हजेरी पद्धत सुरू करण्याची मागणी

रिसोड । प्रतिनिधी



VBG-RAM-G योजनेंतर्गत ग्रामीण भागात सुरू असलेल्या विविध कामांसाठी ऑनलाइन हजेरीची पद्धत लागू करण्यात आली आहे. मात्र, ग्रामीण भागातील इंटरनेट नेटवर्कच्या समस्या, मोबाईल पमधील तांत्रिक अडचणी आणि ऑनलाइन हजेरी नोंदविताना येणाऱ्या अडथळ्यांमुळे शेतकरी, शेतमजूर तसेच संबंधित कामगारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अनेक गावांमध्ये नेटवर्क उपलब्ध नसल्याने वेळेवर ऑनलाइन हजेरी नोंदविता येत नाही. परिणामी प्रत्यक्ष कामावर उपस्थित असलेल्या मजुरांचीही हजेरी नोंदवली जात नाही. याचा थेट परिणाम मजुरांच्या मजुरीवर आणि शेतकऱ्यांच्या कामांवर होत आहे. शासनाने ग्रामीण भागातील परिस्थितीचा विचार करून ऑनलाइन हजेरीची सक्ती बंद करावी. ऑनलाइन प्रणालीमुळे कामगारांना त्रास होत असेल तर पूर्वीप्रमाणे ऑफलाइन हजेरी पद्धत सुरू करावी किंवा ऑनलाइन हजेरीला पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजुरांकडून होत आहे. शासनाने तांत्रिक अडचणींचा विचार न करता केवळ ऑनलाइन प्रणालीचा आग्रह धरू नये. शेतकरी आणि शेतमजुरांच्या सोयीला प्राधान्य देऊन ऑनलाइन हजेरीची सक्ती तातडीने बंद करावी, अन्यथा या प्रश्नावर आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल.

महालॅबची सेवा ठप्प; मोफत तपासण्यांना ब्रेक!

प्राथमिक आरोग्य केंद्रे, 'आपला दवाखाना'मधील प्रयोगशाळा बंद; गरीब रुग्णांची खासगी लॅबकडे धाव

पाचोड । त्रिसिंग जायभाये

सर्वसामान्य आणि गरीब रुग्णांना शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये मोफत प्रयोगशाळा तपासण्यांची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'महालॅब' उपक्रमाला आर्थिक अडचणींचा मोठा फटका बसला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच 'आपला दवाखाना' येथे उपलब्ध असलेल्या मोफत प्रयोगशाळा तपासण्या १ नोव्हेंबरपासून बंद झाल्याने ग्रामीण भागातील गरीब व गरजू रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. आरोग्य विभागाचे कंत्राट असलेल्या एचएलएल कंपनीची मागील दोन वर्षांपासूनची देयके शासनाकडे प्रलंबित असल्याने कंपनीने राज्यातील प्रयोगशाळा सेवा बंद केल्याची माहिती समोर येत आहे. परिणामी, शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये तपासण्यांची सुविधा बंद पडल्याने रुग्णांना आता खासगी प्रयोगशाळांचा आधार घ्यावा लागत आहे.

राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात आरोग्य तपासण्या उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासनाने महालॅब उपक्रम सुरू केला होता. या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि 'आपला दवाखाना' येथे रक्त व इतर विविध प्रकारच्या प्रयोगशाळा तपासण्या मोफत अथवा सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्या जात होत्या. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही सुविधा मोठा आधार ठरत होती. मात्र, निधीअभावी ही सेवा बंद झाल्याने शासनाच्या आरोग्य सुविधांच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

खासगी प्रयोगशाळांचा आधार; गरीब रुग्णांच्या खिशाला कात्री!

शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये रक्त तपासणीसह आवश्यक प्रयोगशाळा तपासण्या होत नसल्याने रुग्णांना खासगी प्रयोगशाळांकडे धाव घ्यावी लागत आहे. खासगी प्रयोगशाळांमधील तपासण्यांचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने गरीब कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. आधीच महागाई, शेतीतील अनिश्चित उत्पन्न आणि आर्थिक अडचणींमुळे त्रस्त असलेल्या शेतकरी व मजूर कुटुंबांना आता आरोग्य तपासण्यांसाठीही पदरमोड करावी लागत आहे.

विशेष म्हणजे, अनेक आजारांचे निदान करण्यासाठी डॉक्टर रक्त व इतर प्रयोगशाळा तपासण्या करण्याचा सल्ला देतात. मात्र, शासकीय स्तरावर ही सुविधा उपलब्ध नसल्याने आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या रुग्णांना तपासण्या पुढे ढकलाव्या लागत आहेत. काही रुग्णांना उसनवारी करून अथवा कर्ज काढून तपासण्या कराव्या लागत असल्याने उपचार प्रक्रियाही रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शासनाच्या मोफत आरोग्य सुविधेवर अवलंबून असलेल्या रुग्णांसमोर आता तपासणी करायची की आर्थिक परिस्थितीचा विचार करून उपचार पुढे ढकलायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

कर्मचारी वाऱ्यावर; उपासमारीची वेळ!

महालॅब उपक्रमांतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही सेवा बंद झाल्याचा परिणाम झाला आहे. या कर्मचाऱ्यांकडून रुग्णांचे रक्त व इतर नमुने संकलित करणे, नमुन्यांची नोंदणी करणे, ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे, तपासणी अहवालांची नोंद ठेवणे व वितरण करणे, तसेच संपूर्ण तपासणी प्रक्रियेत तांत्रिक स्वरूपाची मदत करणे अशी महत्त्वाची कामे केली जात होती. मात्र, प्रयोगशाळा सेवा बंद झाल्याने या कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. नियमित काम बंद पडल्याने त्यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून कर्मचाऱ्यांचे भवितव्यही अंधारात सापडले आहे.

शासकीय प्रयोगशाळांमध्ये एलएसओच्या सहाय्यक म्हणून सामावून घेण्याची मागणी

महालॅब अंतर्गत कामाचा अनुभव असलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आरोग्य यंत्रणेतील प्रयोगशाळांमध्ये एलएसओच्या सहाय्यक म्हणून काम करण्याची संधी द्यावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून होत आहे. या कर्मचाऱ्यांना कामाचा अनुभव असून प्रयोगशाळेच्या दैनंदिन कामकाजाची माहिती आहे. त्यामुळे त्यांना पर्यायी रोजगार उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागू शकतो. शासनाने या कर्मचाऱ्यांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना रोजगाराची हमी द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आरोग्य विभागाने तातडीने हस्तक्षेप करावा

महालॅब सेवा बंद पडल्याने एकीकडे गरीब रुग्णांना खासगी तपासण्यांचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, तर दुसरीकडे या यंत्रणेवर अवलंबून असलेल्या कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने एचएलएल कंपनीची प्रलंबित देयके अदा करून महालॅब सेवा पूर्ववत सुरू करावी. तसेच तोपर्यंत रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.

parbhani 25:Layout 1 11/26/2026 9:22 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

परभणी जिल्हा आवृत्ती | शुक्रवार , दि.२७ नोव्हेंबर २०२६ | पान नं.४

परभणी शहरात अनैतिक संबंधातून इसमाची हत्या महिला व तिच्या दोन मुलांकडून खुनाच्या गुन्ह्याचा उलगडा; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

परभणी/प्रतिनिधी

अनैतिक संबंधातून अपहरण करून एका इसमाची हत्या केल्याची धक्कादायक घटना परभणीत उघडकीस आली आहे. या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छडा लावला असून, आरोपी महिला व तिच्या दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले आहे. नानलपेठ पोलीस ठाण्यात सुलताना बेगम शेख युसूफ यांनी मुलगा शेख युनूस शेख युसूफ बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती. त्यांचा मुलगा मंगळवारी (दि.२४) रात्री



१.३० वाजता ऑटो घेऊन घरातून बाहेर पडला होता. मात्र, तो परत न आल्याने नानलपेठ पोलिसांत गुन्हा क्रमांक ८१४/२०२६, कलम १४०(३) भारतीय न्याय संहितेनुसार अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान अपहृताचा ऑटो कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दर्गा परिसरातील कॅनॉलमध्ये आढळला.

त्यानंतर कॅनॉल परिसरात शोधमोहीम राबविली असता, नवा मोंढा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बलसा शिवारात त्याचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला.पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत महिला व तिच्या दोन मुलांना ताब्यात घेतले.

गीत-नृत्य, नाट्य अन् काव्याचा झंकार; परभणीत युवक महोत्सवात विद्यार्थी कलावंतांची चमकदार कामगिरी!

परभणी/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणाऱ्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवात विद्यार्थी कलावंतांनी गीत, नृत्य, नाट्य, चित्रकला आणि काव्यवाचन अशा विविध कलाप्रकारांतून आपल्या प्रतिभेची चमक दाखविली. विविध सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेतील विजेत्यांची विभागीय स्तरावरील युवक महोत्सवासाठी निवड करण्यात आली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आर्या लॉन्स येथे या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मेरा युवा भारत कार्यालयाचे मुख्य समन्वयक गजानन गाडेकर आणि प्रणित



सांगवीकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले, क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, प्रकाश बनाटे यांच्यासह विविध स्पर्धांचे परीक्षक उपस्थित होते.प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले यांनी युवक महोत्सवाचे महत्त्व विशद केले. तर राहुल वहिवाळयांनी सूत्रसंचालन केले.शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी हे व्यासपीठ महत्त्वपूर्ण असून, विजेत्यांना विभागीय स्तरावर कला सादर करण्याची संधी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.महोत्सवात पथनाट्याच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला. लोकनृत्यातून महाराष्ट्रासह देशाच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडले. काव्यवाचनातून शब्दांचा सामर्थ्यपूर्ण आविष्कार, तर चित्रकलेतून विद्यार्थ्यांची कल्पकता दिसून आली. लोकगीतांच्या सादरीकरणाने लोकसंस्कृतीचा गोडवाही अनुभवायला मिळाला.स्पर्धेच्या निकालात चित्रकला प्रकारात श्रेया राजेश पारपेल्ली हिने प्रथम, श्रद्धा बालाजी रेवनवार हिने द्वितीय, तर खुशाल आनंद भंडारी याने तृतीय क्रमांक पटकावला. लोकगीत स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाने प्रथम, तर नागवंशी प्रतिष्ठान, परभणीने द्वितीय क्रमांक मिळविला. पथनाट्य स्पर्धेत झपूर्जा फाउंडेशनने प्रथम क्रमांक पटकावला. काव्यवाचनात अलका खाडे प्रथम, विकास दळवी द्वितीय, तर सार्थक दीपके तृतीय आला.

लोकनृत्य स्पर्धेत न्यू ज्योतिर्गमय इंग्लिश स्कूलने अव्वल स्थान मिळविले.विविध कलाप्रकारांत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विजेत्यांना विभागीय स्तरावरील युवक महोत्सवात परभणी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका क्रीडा अधिकारी मिलिंद साळवे, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर, रोहन औंढेकर, गजानन तुडमे, प्रकाश पंडित, धीरज नाईकवाडे, योगेश आदमे यांनी विशेष परिश्रम घेतले.

शासकीय योजनांच्या लाभासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावा

जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांचे आवाहन

परभणी/प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी (शेतकरी ओळख-पत्र) अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे अद्याप फार्मर आयडी न काढलेल्या शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक पोर्टलवर तातडीने नोंदणी पूर्ण करून घ्यावी. केवळ फार्मर आयडी नसल्यामुळे शेतकरी शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहू नयेत, असे आवाहन जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय कृती दल समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांच्यासह कृषी,



सहकार, पशुसंवर्धन, बँकिंग, मत्स्यव्यवसाय व कृषी विद्यापीठाचे अधिकारी उपस्थित होते.ॲग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांची डिजिटल नोंदणी करून कृषी योजनांचा लाभ सुलभ करण्यासाठी विविध विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.पीएम-किसान सन्मान निधी, पीक विमा, किसान क्रेडिट कार्ड, कृषी सिंचन, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, फळबाग लागवड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आदी योजनांसाठी फार्मर आयडी महत्त्वाचा आहे.

आगामी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसाठीही तो अनिवार्य राहणार आहे.दरम्यान, रब्बी हंगामासाठी जायकवाडी धरणातून पाणीपुरवठा सुरू असला, तरी आगामी काळात जलसाठा कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा. संभाव्य उन्हाळा आणि बाष्पीभवन लक्षात घेऊन सिंचनाचे नियोजन करण्याची गरज असल्याचेही जिल्हाधिकारी चव्हाण यांनी सांगितले.

उमंग महोत्सवाला परभणीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद तृतीयपंथीयांच्या कलागुणांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

परभणी/प्रतिनिधी तृतीयपंथीय समुदायातील कलावंतांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळावी, समाजात त्यांना सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे, तसेच त्यांच्या कौशल्यांना प्रोत्साहन देऊन रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने परभणीत आयोजित करण्यात आलेल्या 'उमंग महोत्सवा'चे बुधवारी (ता. २५) बी. रघुनाथ रंगमंदिर येथे उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन झाले. या महोत्सवाला परभणीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अरुणा संगेवार, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी



खांडेकर, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे विभागीय अधिकारी सचिन पाईकराव आणि महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळाच्या सहउपाध्यक्ष डॉ. सान्वी जेठवानी यांच्या प्रमुख उपस्थितीत महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला.तृतीयपंथीय समुदायातील अनेक व्यक्तींमध्ये नृत्य, गायन, अभिनय, संगीत तसेच इतर विविध कलांचे नैसर्गिक कौशल्य आहे. मात्र, सामाजिक उपेक्षा आणि संधींच्या अभावामुळे त्यांच्या कलागुणांना अनेकदा योग्य व्यासपीठ मिळत नाही. परिणामी, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळण्यास अडथळे निर्माण होतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि तृतीयपंथीय कलाकारांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उमंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाच्या माध्यमातून तृतीयपंथीय कलाकारांना आपली कला मोठ्या प्रेक्षकांसमोर सादर करण्याची संधी मिळत असून, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासोबतच आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कला आणि कौशल्याच्या माध्यमातून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासही मदत होणार आहे.तृतीयपंथीय समुदायाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलणे, त्यांना समान संधी आणि सन्मान मिळवून देणे, तसेच सामाजिक समावेशकतेची भावना अधिक बळकट करणे, हा या महोत्सवाचा प्रमुख हेतू आहे. परभणीतील या उपक्रमामुळे तृतीयपंथीय कलाकारांना नवी ओळख मिळण्याबरोबरच त्यांच्या कलाविष्काराला प्रोत्साहन देणारे सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे

धर्मापुरीतील जिल्हा परिषद शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा

परभणी/प्रतिनिधी

परभणी तालुक्यातील धर्मापुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत विविध शैक्षणिक व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित शिक्षक, विद्यार्थी व मान्यवरांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक



वाचन केले. विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे मूलभूत अधिकार, कर्तव्ये तसेच लोकशाही मूल्यांवर आपले मनोगत व्यक्त केले.दुपारच्या सत्रात संविधानाच्या अभ्यासावर आधारित बहुपर्यायी सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंदना काळवीट होत्या.

प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माणिक कदम व उपाध्यक्ष मंदाकिनी राणोजी कदम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय भिसे यांनी केले. सूत्रसंचालन कु. धनश्री कदम यांनी केले, तर देवानंद फुलवरे यांनी आभार मानले.यावेळी अनिकेत भराडे, बालाजी इंगोले यांच्यासह शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली

पिंपळदरी शिवारातून २ लाख ६५ हजारांचा गांजा जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई फरार आरोपीचा पोलिसांकडून शोध सुरू

परभणी/प्रतिनिधी

गंगाखेड तालुक्यातील पिंपळदरी शिवारात गांजाची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर परभणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून तब्बल २ लाख ६५ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त केला.

बुधवारी (दि. २५) ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, पोलिसांची चाहूल लागताच या प्रकरणातील आरोपी घटनास्थळावरून फरार झाला असून, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपळदरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळदरी शिवारात गांजाची विक्री केली जात



असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकण्याचे नियोजन केले. पोलिसांना गांजाचा साठा आढळून आला. पोलिसांनी हा संपूर्ण साठा जप्त केला.

जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत २ लाख ६५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.या कारवाईदरम्यान गांजाच्या साठ्याशी संबंधित आरोपी मात्र पोलिसांच्या हाती लागला नाही. तो घटनास्थळावरून फरार झाला. या प्रकरणी पिंपळदरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे. याचाही तपास पोलीस करीत आहेत.पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. जेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली.या पथकात सपोनि. दीपाली गीते, पोलीस अंमलदार महेश कवठाळे, सचिन भदर्गे, राहुल परसोडे, माणिक वाघ आणि दिलीप निलपत्रेवार जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री आणि तस्करी रोखण्यासाठी पोलिसांकडून कारवाई केली जात असून, पिंपळदरी येथील या कारवाईमुळे अंमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

पूर्णा येथे भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न ४५ रक्तदात्यांचे रक्तदान; सामाजिक एकता व मानवतेचा दिला संदेश

पूर्णा/प्रतिनिधी

भारताचे महान स्वातंत्र्यसेनानी शहीद-ए-वतन हजरत टिपू सुलतान (रह.अ.) यांच्या २७६ व्या जयंतीनिमित्त, २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना व निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसेच २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनानिमित्त पूर्णा शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी जामा मस्जिद कव्वाली स्टेजसमोर आयोजित या शिबिरात एकूण ४५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. हुजूर साहेब ब्लड सेंटर यांच्या माध्यमातून रक्त संकलन करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेड येथील सुप्रसिद्ध वक्ते फारुख अहमद साहेब यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी जामा मस्जिदचे पेश



इमाम मौलाना शमीम रिझवी होते. यावेळी मौलाना रशीद बरकाती यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाला शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विशाल भाऊ कदम, संतोष अण्णा एकलारे (माजी नगराध्यक्ष), अब्दुल मुजीब सर, प्रकाश दादा कांबळे, हाजी खलील कुरेशी, रऊफ सर कुरेशी, जाकीर कुरेशी, उत्तम भैय्या खंदारे, रऊफ भैय्या बागवान, जगदीश जोगदंड सर (ज्येष्ठ पत्रकार, दैनिक सकाळ), शेख सलीम भाई सैलानी, शेख खुदूस भाई, राजू भाऊ सोळंके, सलीम भैय्या सौदागर, प्रताप भैय्या कदम, अखिल अहमद, शेख हमीद बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.सेच पोलीस निरीक्षक सचिन बेंद्रे, डॉ. विनय वाघमारे, डॉ. वाजीद, डॉ. वहीद, डॉ. हिलाल, ए. बी. शेख, शेख मुरतूजा, मुन्तजीब खान, साजिद पठाण, विरेश कसबे, तुषार गायकवाड, शेख आसिफ, शेख अनसार, इम्रान पठाण, राजकुमार सूर्यवंशी, वहीद कुरेशी, सिद्धार्थ मामा गायकवाड, शेख शफी भाई यांच्यासह विविध क्षेत्रांतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन शेख सरान भैय्या बागवान यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख वसीम बिल्डर, समीर पठाण, अक्रम बागवान, सय्यद वासिम इंजिनिअर, तोफीक लाला, एम. डी. रऊफ, रियाज शेख, शेख आमेर, सोहेल बागवान, शेख अनवर अन्नू, सय्यद सलमान, शेख जावेद, शाहरुख बागवान, नईम बागवान, आसिफ बागवान, शेख गौस तारा आदींनी परिश्रम घेतले. रक्तदान हेच जीवनदान असून, सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे आभार शेख अक्रम शेख हबीब यांनी मानले. हा कार्यक्रम हजरत टिपू सुलतान मित्र मंडळ, पूर्णा यांच्या वतीने यशस्वीरीत्या संपन्न झाला.

माजी विद्यार्थ्यांच्या भेटीने कानफोडी जिल्हा परिषद शाळेत उत्साहाचे वातावरण!

केंद्रीय मानव अधिकार सुरक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची सदिच्छा भेट; विद्यार्थ्यांचे कौतुक आणि प्रोत्साहनपर मार्गदर्शन

प्रतिनिधी/नीलम चकोले

कानफोडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला केंद्रीय मानव अधिकार सुरक्षा संघटना (दिल्ली) चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र खेडकर, पुणे जिल्हाध्यक्ष विलासराव बांबल तसेच सिटी फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. मंगला खेडकर यांनी सदिच्छा भेट दिली. विशेष म्हणजे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र खेडकर हे याच शाळेचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांच्या आगमनाने शाळेच्या परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शाळेच्या कामकाजाचे मान्यवरांकडून कौतुक यावेळी मान्यवरांनी शाळेतील शैक्षणिक कामकाज, भौतिक सुविधा आणि व्यवस्थापनाची



पाहणी केली. मुख्याध्यापक श्री. पालेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे कामकाज अत्यंत शिस्तबद्ध व दर्जेदार पद्धतीने सुरू असल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. स्वागतगीताने पाहुण्यांची मने जिंकली शाळेत आगमन होताच विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून मान्यवरांचे उत्स्फूर्त स्वागत केले. तसेच चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांमधील कलागुण, आत्मविश्वास आणि उत्साह पाहून मान्यवरांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व रोख बक्षिसांचे वाटपयाप्रसंगी पुणे जिल्हाध्यक्ष विलासराव बांबल यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत शैक्षणिक प्रगती आणि उज्ज्वल भविष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

तर सिटी फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. मंगला खेडकर यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्येकी १० रुपये रोख बक्षीस देऊन गौरविले. आपल्या बालपणीच्या शाळेला अनेक वर्षांनंतर एका महत्त्वपूर्ण पदावर कार्यरत असताना भेट देण्याचा आनंद महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र खेडकर यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत शाळेची होत असलेली प्रगती पाहून समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाला शाळेचे सहाय्यक शिक्षक आपोतीकर सर, अंगणवाडी शिक्षिका मंगला कुबडे, वंदना गावंडे यांच्यासह शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.


या संपूर्ण कार्यक्रमाचा वृत्तांत नागपूर प्रतिनिधी सौ. मंगला खेडकर यांनी घेतला.

दहेगावजवळ कळमेश्वरनागपूर मार्गावर स्कुटीची धडक;

रस्ता ओलांडताना गुड्डू हरी अदवंशी जखमी, देव्यांशी फाउंडेशन ॲम्बुलन्सने रुग्णालयात केले दाखल!

प्रतिनिधी नीलम चकोले

कळमेश्वर । दिनांक : २५ नोव्हेंबर २०२६ । वेळ : सायंकाळी ७:४५ वाजता कळमेश्वरनागपूर मार्गावरील दहेगावजवळ आज सायंकाळी ७:४५ वाजताच्या सुमारास अपघाताची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गुड्डू हरी अदवंशी हे रस्ता ओलांडत असताना नागपूरकडून कळमेश्वरच्या दिशेने येणाऱ्या एका स्कुटीची त्यांना धडक बसली. या अपघातात गुड्डू हरी अदवंशी जखमी झाले, व महिला सुद्धा जखमी महिलाला तेथील नागरिकांनी मदत करून



उपचाराकरता दवाखान्याला पाठवले.

अपघाताची माहिती मिळताच सामाजिक व रुग्णसेवक मंगेश गमे यांच्या मार्गदर्शनाखाली देव्यांशी फाउंडेशनची ॲम्बुलन्स तातडीने घटनास्थळी रवाना झाली. ॲम्बुलन्स टीमने जखमी गुड्डू हरी अदवंशी यांना तातडीने मदत करून पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, कळमेश्वर येथे दाखल केले.अपघातग्रस्तांना वेळेत वैद्यकीय मदत मिळावी, या उद्देशाने देव्यांशी फाउंडेशनची ॲम्बुलन्स टीम सातत्याने तत्परतेने कार्यरत आहे. या अपघाताचा पुढील तपास कळमेश्वर पोलीस करीत आहेत.

देव्यांशी फाउंडेशन रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा!

मंगेश गमे

सामाजिक व रुग्णसेवक

देव्यांशी फाउंडेशन, कळमेश्वर

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, तनिश ऑर्चिड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी रोड, चरोली फाटा, ता.हवेली, जि.पुणे, महाराष्ट्र ४१२१०५ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. * पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) इमेल:-jagmitra2010@gmail.com

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, Tanish Orchid, Phase 2, R-Wing, 1105, Alandi Rd, Charoli Phata, Ta. Haveli, Dist. Pune, Maharashtra 412105. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com